दिवाळीचा मोठा अंक

REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**

कार्यालयांत पत्राद्वारे चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**

वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख १८ आक्टोबर, १९४४ अंक ४१

## देना बँक

देवकरण नानजी बँकिंग कं. लिमिटेड

ची

६ वर्षे आणि ३ वर्षांची

अनुक्रमें ३॥ टक्के आणि २॥। टक्के व्याज देणारीं

### कॅश सर्टिफिकिटें

रु. १० पासून रु. ५,००० पर्यंतच्या विभागांत
मिळूं शकतात.

स्थानिक तीनहि शाखांची सेव्हिंग्ज बँक डिपार्टमेंट्स
प्रत्येक रविवारीं सकाळीं उघडीं राहतील.

## देना विमा कंपनी

मध्यें

तुमचा विमा उतरवा

### जिंदगी ★ आग ★ मोटर

सुरेंद्र के. देसाई,
मॅनेजर.

हिंमतलाल गांधी,
मॅ. डायरेक्टर.

देवकरण नानजी बिल्डिंग्ज, एल्फिन्स्टन सर्कल,
कोट, मुंबई.

## न्यू इंडिया इंडस्ट्रीज, लि.

२६ लॅमिंग्टन रोड ( नॉर्थ ), मुंबई ११

: अध्यक्ष :

श्री. गणेश सदाशिव मराठे, ॲक्चुअरी

: मॅनेजिंग एजंट्स :

मराठे आणि कंपनी

### विविध खरी माल करणारा अशा प्रकारचा पहिलाच महाराष्ट्रीय कारखाना

★ सरकारी मान्यता ★

ऑर्डिनरी शेअर्सवर भरपूर डिव्हिडंड : ठेवी स्वीकारल्या जातात.

तार : ' NUTRED '
टेलि : ४०६८९

पु. ग. मराठे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि सोलापूर डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सोलापूर.

स्थापना १९१८

हेड ऑफिसः—सोलापूर.

शाखाः—कुर्डुवाडी, पंढरपूर, करमाळा.

चेअरमन, बोर्ड ऑफ डायरेक्टर्सः—श्री. एम. व्ही. लेले, बी. ए., एलएल. बी., वकील, सोलापूर.

मांडवल

| | | |
|---|---|---|
| अधिकृत मांडवल | रु. | १,५०,०००/- |
| वसूल झालेलें मांडवल | रु. | १,३१,०००/- |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,१६,०००/- |
| एकूण खेळतें मांडवल | रु. | ३०,००,०००/- |
| सन १९४३-४४ चा नफा | रु. | ११,३०१/- |
| मंजूर झालेलें डिव्हिडंड | | ५ टक्के |

हेड ऑफिसांत व शाखा ऑफिसांत सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार करण्यांत येतात. ठेवींचे दरांबद्दल व नियमांबद्दल समक्ष ऑफिसांत चौकशी करावी अथवा अर्ज करून नियम मागवावेत.

सी. एस. परांजपे,
मॅनेजर.



## नूतन वर्षाचें अभीष्टचिंतन

आमचे विमेदार, प्रतिनिधी व हितचिंतक यांस यंदाची दिवाळी व नूतन वर्ष सुखाचें व भरभराटीचें होवो !

## दि औंध म्युच्युअल लाइफ अॅशुअरन्स सोसायटी लि.

रामनिवास, लक्ष्मी रोड, पुणें २.

### महाराष्ट्राची पहिली म्युच्युअल विमा कंपनी.

वैशिष्टयः—एजंटांस कायम व वंशपरंपरा कमिशन दिलें जातें.

सर्वत्र उत्साही एजंटस नेमणें आहेत.

आर. जी. साठे, सुपरिन्टेंडेंट.

व्ही. जी. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर.

मुंबईचे चीफ एजंटसः—मे. के. डब्ल्यू. फडके आणि कं. गिरगांव बॅक रोड.



**Under The Patronage of the Government of His Highness The Rajasaheb of Sangli**

## दि सांगली बँक लि०

( स्थापना १९१६ )

बोर्ड ऑफ डिरेक्टर्सः—(१) राव. ह. ब. कुलकर्णी
(२) शेठ ने. आ. पाटील
(३) „ ज. वि. करमरकर
(४) „ ता. श्री. आरवाडे

| | | |
|---|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. २,००,००० |
| रिझर्वस् | ... | रु. २,००,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. ५७,००,००० |

हेड ऑफिसः—सांगली ( S. M. C. )

शाखाः—१ शहापूर २ शिरहट्टी ३ तेरदळ ४ रबकवी ५ कवठें ६ मंगळवेढें ७ तुपारी ( ताकारी M. S. M. Rly. ) ८ उगार ( M. S. M. Rly. ) ९ विलिंग्डन कॉलेज ( जि. सातारा )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**P. S. MOKASHI,**
मॅनेजर.

श्री

# दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, लि०, पुणें.

**संचालक मंडळ**

१ डॉ. व्ही. डी. फाटक, एल. आर. सी. पी., एम. आर. सी. एस., एल. एम. (रोटंडा), पुणें. ( चेअरमन )

२ दिवाण बहादुर एन. सी. लिमये, बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट आणि सरकारी वकील, सोलापूर.

३ श्रीमंत सरदार जगन्नाथमहाराज पंडित, फर्स्ट क्लास सरदार, इनामदार व कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद, भाऊमहाराज निकेतन, पुणें.

४ डॉ. रघुनाथ गणेश ठकार, एल. एम. ॲन्ड एस., ( माजी स्टेट सर्जन, सांगली ), पुणें.

५ श्री. आण्णाजी पांडुरंग कोंडे देशमुख, जमीनदार व व्यापारी, अध्यक्ष, भोर संस्थान देशमुख संघ, पुणें.

६ श्री. महादेव रामचंद्र तांबे, बी. ए., एल. सी. इ., रिटायर्ड चीफ अकौंटंट, बॉम्बे कॉर्पोरेशन, मुंबई.

७ श्री. आर. बी. भट, पुणें.

८ रा. ब. बी. एल. मोडक, एम. सी. ई., एम. इन्स्ट. सी. ई., आय. एस. ई. ( रि. ), पुणें.

९ श्री. गजानन विश्वनाथ साळवेकर, बी. ए., मुंबई.

१० डॉ. रा. ह. मढकमकर, एम. ए., एम. डी., पुणें.

११ श्री. चंद्रशेखर गोविंद आगाशे, बी. ए., एलएल. बी., ( एक्स ऑफिशिओ ), पुणें.

## —:गेल्या वर्षांतील निवळ नफ्याची सर्वानुमतें वांटणी :—

| | |
|---|---|
| ऑर्डिनरी भागीदारांस १०% डिव्हिडंड ... | रु. ५५,५०० |
| रिझर्व्ह फंड ... ... | रु. १,२५,००० |
| डिव्हिडंड इक्लायझेशन फंड ... ... | रु. ७५,००० |
| कामगारांच्या सुखसोयींसाठी तरतूद ... ... | रु. ५०,००० |
| डे. ए. सोसायटीच्या नव्या व्यापारी कॉलेजासाठी देणगी ( आतां 'दि बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स' ) ... | रु. २,००,००० |

## —कंपनीच्या भागीदारांस व ठेवीदारांस—

# नवें वर्ष सुखाचें जावो

**मेसर्स सी. जी. आगाशे ॲंड को.**

मॅनेजिंग एजंटस

सतत एकोणतीस वर्षे खास लोकाश्रयाखालीं चाललेली
व विश्वासास पात्र झालेली आणि कोल्हापूर
इलाख्यांतील आद्य सहकारी संस्था

दि कोल्हापूर अर्बन को-ऑपरेटिव्ह
बँक लिमिटेड, कोल्हापूर

स्थापना १९१३ इसवी

| | रु. |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | ७५,००० |
| जमा झालेलें भांडवल ... ... | ४८,६४० |
| रिझर्व्ह फंड ... ... | ६२,४०८ |
| इतर फंडस ... ... | ६६,२७९ |
| सरकारी रोख्यांत वगैरे ... ... | ६९,३७६ |

बँकिंगसंबंधीं सर्व प्रकारचीं कामें केलीं जातात. बँकेचीं तिमाही सांपत्तिक पत्रकें कायद्यानुसार सरकारी गॅझिटमध्यें प्रसिद्ध केलीं जातात. ठेवींच्या व्याजाचे दरासंबंधीं व विशेष माहितीसाठी भेटा अगर लिहा.

के. जी. राणे, ऑफि. मॅनेजर.
येशवंत रामजी भोयटे, प्रेसिडेंट. दि कोल्हापूर अर्बन को. बँक लि.

रूरल प्रॉडक्टस कंपनी, लिमिटेड
९५१ सदाशिव, पुणें २.

दिवाळीनिमित्त शुभचिंतन

आमच्या ग्राहकांस, ठेवीदारांस व भागीदारांस दिवाळीचे आनंदाचे वेळीं, कंपनीचा माल टोमॅटो केचप (सॉस) हिंदुस्थान सरकारचे फूड डिपार्टमेंटनें पास केला असल्याचें व स्थानिक खरेदी खात्यामार्फत माल खरेदी केला जात असल्याचें आनंददायक वृत्त कळवीत आहों. भागीदारांस, ठेवीदारांस व गिऱ्हाइकांस दिवाळी आनंददायक जावो अशी प्रार्थना करीत आहों.

मॅनेजिंग डायरेक्टर.

तुमच्या सहकार्यानेंच अल्पावधींत उच्चांक पटकावणारें.

कॅमल वों ध चि न्ह

सर्वांच्या स्मृतींत असूं द्या.




कॅमल म्हणजेच—

शाई, गम, पेस्ट, चॉक, सीलिंग वॅक्स, त्रिलियंटाइन.....

त्याचप्रमाणें :

कॅम्लीन्स् टूथ पावडर

कॅमल इंकचे कारखानदार :

दांडेकर कंपनी.....मुंबई नं. २८.

# अ नु क्र म णि का

पृष्ठ
१ इंग्लंडचें आंतरराष्ट्रीय देणें-घेणें ... ... ३२५
२ स्फुट विचार ... ... ... ३२६
सर चिंतामणराव देशमुख ह्यांचा सल्ला–हिंदी व्यापारी मंडळाच्या मागण्या–कृत्रिम व नैसर्गिक रबर.
३ पुणें शहराची ऐतिहासिक कालांतील वाढ (ले. नी. वि. सोवनी, गोखले अर्थशास्त्र संशोधन मंदिर, पुणें) ३२७
४ ग्रंथालयांची युद्धोत्तर पुनर्घटना (ले. र. श. पारखी, असि. लायब्रेरिअन, जे. वाडिया लायब्ररी) ... ३२९
५ न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया ... ... ३२९
६ रशिया व अमेरिका ह्यांचे संबंध ... ... ३३१
७ सहकारी कंझ्युमर्स स्टोर्स (ले. एस. टी. पघु, चेअरमन, डे. जिमखाना को. कं. सोसायटी) ... ३३२
८ रिझर्व्ह बँकेकडील सरकारी ठेवी ... ... ३३३
९ आपल्या पुढील कांहीं प्रश्न (ले. 'संजय') ... ३३५
१० विमा कायद्यांत नवीन सुधारणा (ले. वि. गो. जोशी, मॅ. डायरेक्टर, औंध म्यु. विमा कं.) ... ३३६
११ कच्च्या मालाचा पुरवठा करणारे देश ... ३३८
१२ साठे ब्रदर्सचा कारखाना ... ... ३३८
१३ भारत इं. बँक ... ... ... ३३९
१४ मॅनेजिंग एजंटांचा नफा ... ... ३३९
१५ इन्कम टॅक्सबाबत निवाडे ... ... ३४१
१६ रशियांत काडीमोड महाग व अवघड ... ३४३
१७ इंग्लंडमध्यें वर्णद्वेषाचें प्रदर्शन .... ... ३४३

## मॅनेजिंग एजंटाच्या प्राप्तीचा सार्वजनिक संस्थांकडे ओघ

बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. चे श्री. आगाशे ह्यांच्या कांहीं ठळक देणग्या

(खालील माहिती श्रमपूर्वक मिळवून दिल्याबद्दल आम्ही श्री. न. गं. आपटे ह्यांचे आभारी आहों.)

| | रुपये |
|---|---|
| बृहन्महाराष्ट्र मंडळ, दिल्ली | २०,००० |
| वैदिक संशोधन मंडळ, पुणें | १०,००० |
| मराठी ग्रंथसंग्रहालय, पुणें | ५,००० |
| डे. ए. सोसायटीचें गर्ल्स हायस्कूल | ५,००० |
| हुबळी को. हॉस्पिटल | ३,००० |
| वेदशास्त्रोत्तेजक सभा | ३,००० |
| शब्दकोष मंडळ | २,५०० |
| तळेगांव हॉस्पिटल | १,००० |
| वैदिक पाठशाळा | १,००० |
| ब्राह्मण सभा, मुंबई | १,००० |
| अनाथ महिलाश्रम, पुणें | १,००० |
| पाली क्रीडामंडळ, पाली | १,००० |
| जांभ समर्थ मंदिर | १,००० |
| महाराष्ट्रीय मंडळ, पुणें | १,००० |
| मराठा चेंबर | १,००० |
| मिलिटरायझेशन बोर्ड | १,००० |
| ना. दा. ठाकरसी कन्याशाळा | १,००० |

वर्ष १० वें | अर्थ | अंक ४१ वा
बुधवार, ता. १८ आक्टोबर १९४४

# ★ इंग्लंडचें आंतरराष्ट्रीय देणें-घेणें व हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलका ★

अमेरिकेंत ब्रेटनवुड्स येथें भरलेल्या जागतिक चलन-परिषदेच्या समाप्तीपासून तीमध्यें मान्य झालेल्या ठरावांची चर्चा इंग्लंड, अमेरिका व हिंदुस्थान ह्या देशांत चालली आहे. हिंदुस्थानच्या प्रतिनिधींनीं त्या परिषदेंत केलेल्या सर्व सूचना फेटाळल्या गेल्या हें प्रसिद्ध आहे. परिषदेचे निर्णय तिच्या सभासदांवर बंधनकारक होणारे नव्हते आणि तिला उपस्थित असलेल्या प्रतिनिधींनीं आपापल्या सरकारांपुढें ते मांडावयाचे होते. इंग्लंड, अमेरिका व रशिया ह्यांच्या सरकारांच्या मतास अनुसरूनच चलन परिषदेचे ठराव झाले असल्यामुळें त्यांचा स्वीकार त्या देशांकडून होण्यास विशेष अडचण भासणार नाहीं. तथापि तेथेंहि ब्रेटनवुड्स परिषदेच्या ठरावांवर टीका होत असून त्यांस थोडाबहुत विरोधहि होत आहे. ब्रिटिश व अमेरिकन कायदेमंडळांपुढें हा विषय त्यांच्या मंत्रिमंडळांस मांडावा लागेल आणि त्यांची संमति मिळवावी लागेल. परिषदेस हिंदुस्थानच्या वतीनें उपस्थित झालेले प्रतिनिधी स्वतःचें प्रतिवृत्त व सूचना मध्यवर्ती सरकारास सादर करतील आणि असेंब्लीचा अभिप्राय त्यास घ्यावा लागेल. जागतिक चलन निधि आणि आंतरराष्ट्रीय बँक ह्या नियोजित व्यवस्थांचा ह्या देशास कांहींच उपयोग त्याच्या इच्छेप्रमाणें होणारा नसल्याकारणानें हिंदुस्थानानें त्या योजनांत सामील होण्याचें प्रयोजन नाहीं असें मत येथें व्यक्त करण्यांत येत आहे. ह्याच्या उलट, असल्या महत्त्वाच्या जागतिक व्यवस्थेपासून हिंदुस्थाननें दूर रहाण्यांत स्वारस्य नाहीं असेंहि प्रतिपादलें जात आहे.

## " इंग्लंडचें अग्रेसरत्व कायम राहील "

ब्रिटिश फडनवीस, सर जॉन अँडरसन आणि बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर, लॉर्ड कॅट्टो, ह्यांस चलन परिषदेच्या योजना आणि इंग्लंडचा युद्धोत्तर व्यापार व व्यवहार ह्यांचे संबंधांत मत प्रदर्शित करणें आवश्यक झालें आहे. ह्यावरून प्रस्तुत विषयास ग्रेटब्रिटनच्या दृष्टीनें किती महत्त्व आहे हें दिसून येतें. आपल्या लंडनमधील स्टर्लिंग शिलकांचा प्रश्न हिंदी लोकांस अत्यंत जिव्हाळ्याचा वाटतो, त्याचप्रमाणें ह्या शिलका हिंदुस्थानास परत कशा द्यावयाच्या ह्या बाबतच्या आपल्या निर्णयाचें समर्थन करण्याचें ब्रिटिश अधिकाऱ्यांस व धंदेवाल्यांस अगत्य भासतें. ह्या हिंदी आणि ब्रिटिश दृष्टिकोनांत तीव्र भिन्नता आहे आणि ह्याकरितां ब्रिटिश बाजूच्या पुरस्कर्त्यांस स्वतःचे मुद्दे युद्धोत्तर काळांतील जागतिक पुनर्रचनेच्या व इंग्लंडच्या स्वास्थ्याचे दृष्टीनें पुढें मांडावे लागत आहेत. मॅन्शन हाऊसमध्यें भाषण करतांना लॉर्ड कॅट्टो ह्यांनीं युद्धसमाप्तीनंतर इंग्लंडकडे पूर्वीचें औद्योगिक, व्यापारी व सांपत्तिक अग्रेसरत्व राहील काय ह्या कांहीं शंकितांनीं उपस्थित केलेल्या प्रश्नास ठासून होकारार्थी उत्तर दिलें. पिढ्यानुपिढ्या चालत असलेल्या व्यापारी सचोटीच्या परंपरेच्या व अनुभवाच्या योगानें इंग्लंडचें जागतिक पुढारीपणाचें स्थान अढळ राहील असें त्यांनीं सांगितलें. युद्धाप्रीत्यर्थ इंग्लंडनें स्वतःचें संपत्तिसर्वस्व वेचलें आहे आणि ह्यामुळें त्या देशास बाहेरच्या जगाचें मोठें कर्ज देणें झालें आहे. त्याचा अर्थ इतकाच आहे कीं ह्यापुढें इंग्लंडला आपला निर्यात व्यापार इतका वाढवावा लागेल कीं, त्यांत इतर देशांचें झालेलें युद्धकालांतलें देणें देऊन टाकण्यास पुरेशी फूस रहावी. इंग्लंडच्या हिंदुस्थानसारख्या धनकोंनीं ब्रिटिश माल मोठ्या प्रमाणांत खरेदी करून त्या देशास कर्जफेड करण्यास सहाय्य केलें पाहिजे आणि असा सहकार होईल तर कांहीं वर्षांच्या अवधींत क्रमाक्रमानें व सोयीसोयीनें हिंदुस्थानास आपल्या स्टर्लिंग शिलकांचा पैसा परत मिळूं शकेल असें लॉर्ड कॅट्टो ह्यांनीं स्पष्टपणानें सांगितलें.

## हिंदुस्थानची न्याय्य मागणी

सर जॉन अँडरसन ह्यांच्या भाषणांत वरील सारख्याच आत्मविश्वासाचा सूर होता आणि बाहेरच्या देण्याच्या फेडीविषयींच्या मार्गांचा सरळ अनुवाद होता. धनको देशांनीं दम धरला पाहिजे आणि युद्धाचे कामीं इंग्लंडनें केलेली स्वार्थत्यागपूर्ण कामगिरी हिशेबांत घेणें आवश्यक आहे असें त्यांनीं सांगितलें. युद्धपरिस्थितींत झालेलें देणें व्यापारी देण्यासारखें मानलें जातां कामा नये आणि त्याच्या फेडीचे बाबतींत परस्परविश्वास आणि सहकार्य हीं आवश्यक आहेत असें ते म्हणाले. येथें हिंदुस्थाननें केलेला स्वार्थत्याग आणि त्याच्या तीव्र आर्थिक गरजा यांचा त्यांनीं विचार व उल्लेख केला असता तर बरें झालें असतें. हिंदुस्थानची सबंध शिलक एकदम फेडून टाका अशी ह्या देशाच्या लोकांची मागणी नाहीं. ब्रिटिश जनतेच्या रहाणीचा दर्जा युद्धापूर्वींच्या काळाबरोबर राहून तिनें माल मोठ्या प्रमाणावर बनवून तो परदेशांस विकावा आणि त्या मार्गानें इंग्लंडचें बाहेरचें देणें फेडण्यास मदत करावी असें सर जॉन व लॉर्ड कॅट्टो म्हणतात. हाच न्याय त्यांनीं हिंदुस्थानास लावावयास नको काय ! हिंदुस्थानांतलें संपत्तीचें उत्पादन वाढावें आणि येथील लोकांची राहणी सुधारावी ह्यासाठीं लागणारी यंत्रसामुग्री व इतर माल ह्यांचा पुरवठा ह्या देशास त्याच्या परदेशांकडून परत यावयाच्या पैशांतून करण्यास इंग्लंडनें सहाय्य देणें आवश्यक नाहीं काय ! हिंदी लोकांची ही मागणी योग्य व न्याय्य नाहीं काय ! हिंदुस्थानचें दारिद्र्य जगजाहीर असून आर्थिक पुनर्रचनेचें ह्या देशाचें अगत्य सर्वमान्य आहे. ह्या वस्तुस्थितीवर तातडीचा उपाय म्हणून स्टर्लिंग शिलकांच्या फेडीची विशिष्ट व मर्यादित स्वरूपाची मागणी केली जात आहे. तिचा विपर्यास न होतां ती पुरी होण्याचा मार्ग इंग्लंडनें शोधून काढणें आवश्यक आणि उचित आहे.

# आमच्या सर्व हितचिंतकांस नवें वर्ष सुखाचें जावो.

# स्फुट विचार

## सर चिंतामणराव देशमुख ह्यांचा सल्ला

बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर लॉर्ड कॅट्टो, ह्यांच्या युद्धोत्तर ब्रिटिश निर्गत व्यापाराविषयींच्या आत्मविश्वासमूलक अभिप्रायाचा उल्लेख आजच्या अग्रलेखांत आम्हीं केला आहे. हिंदुस्थानच्या स्टर्लिंग शिलकांची फेड इंग्लंड स्वतःच्या सोयीप्रमाणें व सवडीस अनुसरून करूं शकेल आणि ती लवकर किंवा हिंदी धंदेवाल्यांच्या मागणीप्रमाणें होण्याची कोणीहि अपेक्षा करूं नये असें त्यांनीं बजावलें. हा प्रश्न ब्रेटनवुड्स येथील जागतिक चलन परिषदेंत हिंदुस्थानच्या वतीनें उपस्थित केला गेला तेव्हां त्याचा निकाल इंग्लंड व हा देश ह्यांनीं परस्पर विचारानें सोडवावा आणि त्यासंबंधांत नियोजित जागतिक चलननिधीच्या मार्फत कोणतीहि तजवीज करतां येणें शक्य नाहीं असें सरळ सांगण्यांत आलें. हिंदी रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, सर चिंतामण देशमुख, ह्यांनीं मुंबईस रोटरी क्लबांत भाषण करतांना ह्या विषयाचा हिंदुस्थानास प्रतिकूल असा निकाल कां लागला ह्याचीं कारणें सांगून आपल्या देशबांधवांस असा सल्ला दिला कीं त्यांनीं चलन परिषदेनें मान्य केलेल्या योजना फेटाळण्याची घाई करूं नये. अमेरिका व इंग्लंड ह्या देशांत त्यांचेवर वादविवाद चालू आहे, त्याचें काय होतें तें प्रथम पहावें आणि मध्यंतरीं ब्रिटिश माल जेव्हां येऊं शकेल तेव्हां तो स्वीकारण्याची आपण तयारी ठेवावी असें त्यांनीं सुचवलें. म्हणजे पर्यायानें त्यांनीं ब्रिटिश फडनवीस आणि लॉर्ड कॅट्टो ह्यांच्या विचारसरणीस दुजोरा दिला असें झालें. हिंदुस्थानचा पैसा लंडनमध्यें स्टर्लिंगच्या स्वरूपांत अडकून पडला आहे आणि तो इंग्लंडच्या सवडीप्रमाणेंच वसूल केल्यावांचून गत्यंतर नाहीं अशी असाहयतेची स्थिति असल्याचें त्यांनीं ध्वनित केलें. आपल्या शिलकांचे पैसे आपणांस परत मिळणार ह्यांत शंका नाहीं, पण त्या बाबतींत आपण दमादमानें घेतलें पाहिजे असा त्यांच्या सांगण्याचा आशय होता. पण ह्या प्रकारच्या अनिश्चितपणाच्या स्थितींत हिंदी धंदेवाल्यांनीं व व्यापाऱ्यांनीं आपणांस कोणता माल हवा आणि तो कोणत्या हुंडणावळीच्या दरानें घेणें परवडेल हें कसें ठरवावयाचें व त्याविषयींची तयारी कशी ठेवावयाची ह्याचा खुलासा सर चिंतामण ह्यांनीं केला नाहीं. ह्या कारणानें व्यावहारिक दृष्टीनें पाहातां त्यांचा सल्ला फारसा उपयोगी पडण्यासारखा नाहीं.

---

## हिंदी व्यापारी मंडळाच्या मागण्या

रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांचे वरील सल्ल्यानें हिंदी व्यापारी वर्गाचें समाधान होणें शक्य नाहीं. दि फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या कार्यकारी मंडळानें हिंदुस्थान सरकारास प्रस्तुत बाबीचे संबंधांत पाठवलेल्या पत्रावरून हें उघड होतें. स्टर्लिंग शिलकांच्या प्रश्नाची चर्चा हिंदी सरकारनें ब्रिटिश सरकारशीं त्वरित करावी अशी फेडरेशनची मागणी आहे. लंडनमधील स्टर्लिंगच्या मोबदल्यांत डॉलर हुंड्या बँक ऑफ इंग्लंडकडून मिळावयाच्या नाहींत आणि हिंदी शिलका लंडनमध्यें व्यर्थ पडून रहातील अशी भीति आपणांस वाटत असल्याचें ह्या हिंदी व्यापारी मंडळानें सरकारला कळवलें आहे. हिंदुस्थानच्या आर्थिक हितसंबंधाचें योग्य रक्षण होईल अशा रीतीनें स्टर्लिंगच्या प्रश्नाचा निकाल इंग्लंडनें लावला नाहीं, तर ह्या देशानें चलन परिषदेच्या जागतिक गंगाजळी आणि बँक ह्याविषयींच्या मोठ्या योजनांत सामील होणें ह्या देशास कठिण होईल असें त्यानें बजावलें आहे. फेडरेशननें सरकारास दुसरें एक पत्र लिहून त्यांत असें सुचवलें आहे कीं त्यानें चलन परिषदेचें इतिवृत्त आणि तिच्या हिंदी प्रतिनिधींचा अभिप्राय हीं प्रसिद्ध करावीं आणि व्यापारी वर्गास त्यावरील स्वतःचें मत प्रकट करण्याची संधी देऊन नंतर हें सर्व प्रकरण मध्यवर्ती असेंब्लीपुढें मांडावें. अमेरिकेकडे डॉलर्समध्यें हिंदुस्थानचें येणें झालें आहे त्याची रकम किती आहे आणि ती एका स्वतंत्र साम्राज्य गंगाजळींत सामील करण्यांत आली असल्यास ह्या डॉलर्सपैकी ह्या देशाच्या खात्यास किती वाटा आला आहे किंवा येईल ह्याची माहिती सरकारनें पुरवावी अशीहि मंडळाची मागणी आहे. साम्राज्य गंगाजळींतल्या डॉलर्समधला हिंदुस्थानचा हिस्सा सप्रमाण बाहेर काढण्यांत येऊन ह्यापुढें डॉलर्समधलें ह्या देशाचें येणें निघेल तें निराळें बाजूस काढून ठेवलें जावें असेंहि त्यानें म्हटलें आहे. लंडनमधील हिंदी मालकीच्या स्टर्लिंगचे डॉलर्स करून मिळूं शकत नाहींत तर निदान अमेरिकेकडून यावयाचे डॉलर्स तरी ह्या देशास वापरतां येतील ह्या बेतानें एका स्वतंत्र खात्यांत ठेवले जावे ही सूचना ब्रिटिश सरकाराकडून मान्य करून घेतली जाणें अगत्याचें आहे. हिंदी शिलकांची व्यवस्था केवळ आपल्या स्वतःच्या सवडीप्रमाणें आपण करूं आणि हिंदुस्थानच्या गरजा व अडचणी ह्यांचा विचार होणार नाहीं असें इंग्लंडनें म्हणून चालणार नाहीं.

---

## कृत्रिम व नैसर्गिक रबर: युद्धोत्तर परिस्थिति

कृत्रिम रबराचें उत्पादन कितीहि वाढलें तरी नैसर्गिक रबराशीं तें स्पर्धा करूं शकणार नाहीं, अशी कित्येकांची अपेक्षा आहे. परंतु, कृत्रिम रबराचें उत्पादन युद्धानंतर कमालीचें वाढेल व त्याची किंमतहि खालीं येईल हें उघड आहे. एकटी अमेरिका दरसाल १०,७५,००० टन कृत्रिम रबर तयार करूं शकेल. कृत्रिम रबराच्या धावांचे उत्पादनासाठीं लागणाऱ्या यंत्रसामुग्रींत अमेरिकेनें ७½ कोटि पौंड गुंतविलेले आहेत. चालू युद्धापूर्वी कृत्रिम रबराचा उत्पादन खर्च दर पौंडी ७० सेंट होता, आतां तो ४० ते ५० सेंटवर आला आहे. युद्धानंतर, उत्पादनखर्च १२ ते १५ सेंट इतकाच येईल. गुडायिअर कंपनीचे सुमात्रा, फिलिपाइन्स व कोस्टारिका येथें स्वतःचे रबराचे मळे आहेत. फायरस्टोन कंपनीचे मळे लैबेरियांत आहेत. मळ्यांतील रबराच्या उत्पादनाचा खर्च ह्यापुढें ज्यास्त येईल व कृत्रिम रबराच्या उत्पादन खर्चाशीं तो बरोबरी करील, असें ह्या कंपन्यांचे चालक म्हणतात. लष्करी मागणी संपल्यावर अमेरिकेची मामुली मागणी पुरी करण्यास दरसाल ११,१०,००० टन रबर लागेल व बाकीच्या सर्व जगास ५,००,००० टन रबर पुरेल. म्हणजे, वार्षिक जागतिक मागणींचा हिशेब सुमारें १६,००,००० टन झाला. अमेरिका दरसाल १०,७५,००० टन कृत्रिम रबर पुरवूं शकेल. मळ्यांतील रबर मुबलक प्रमाणांत मिळूं लागेपर्यंत रबराची मागणी पुरी पडणें अवघड जाईल व रबराचे धंद्यांत अमेरिका अग्रेसर राहील, हें उघड आहे.

# पुणें शहराची ऐतिहासिक कालांतील वाढ

[ १९३७–३८ सालीं गोखले अर्थशास्त्र संशोधन मंदिरानें पुणें शहराची आर्थिक व सामाजिक पाहणी केली होती. तिचा अहवाल आतां तयार झाला असून तो Poona: A Socio-Economic Survey या नांवानें लवकरच प्रसिद्ध होईल. या अहवालांतील पहिल्या प्रकरणांत पुणें शहराचा उपलब्ध इतिहास व शहराची क्रमशः झालेली वाढ याबद्दल विवेचन केलेलें आहे. त्या प्रकरणांतील एका भागाचा त्रुटित गोषवारा या लेखाचे द्वारें प्रथमतःच प्रकाशित होत आहे. ]

पुणें शहर कां व कसें अस्तित्वांत आलें व त्याचा क्रमशः विकास कसा झाला हें ठरविण्याच्या मार्गांत पुष्कळच अडचणी उद्भवतात. अशा प्रकारच्या संपूर्ण विवेचनासाठी लागणारा पूर्वीच्या अवशेषासारखा प्रत्यक्ष पुरावा व शहरासंबंधीं कागदोपत्रीं असणारा लेखी पुरावा भरपूर प्रमाणांत उपलब्ध नाहीं. ४–५ वेळां पुणें शहराची नासधूस व जाळपोळ ऐतिहासिक काळांत झाली असल्यानें पूर्वीचे अवशेष हल्ली कितपत शिल्लक असतील यासंबंधीं शंकाच आहे. कागदोपत्रीं असणारा पुरावा ठिकठिकाणीं विखुरलेला, विसंगत व पुष्कळ वेळां अविश्वासार्ह असा आढळून येतो. पुराव्याचे हे सर्व दोष लक्ष्यांत बाळगूनच या कार्यास आम्हीं हात घातला व उपलब्ध असलेला पुष्कळसा पुरावा एकत्र करून व त्याची बारकाईनें छाननी करून त्याआधारें पुणें शहराच्या विकासाचा आराखडा आम्हीं तयार केला आहे. हाच सर्वस्वीं बरोबर आहे असा आमचा आग्रह नाहीं. माहितीच्या वगैरे चुका त्यांत असण्याचा संभव आहे. फक्त त्या राहूं नयेत यासाठी आम्हीं आमच्याकडून शक्य तेवढे प्रयत्न केले आहेत, येवढेंच येथें आम्हांस नमूद करणें आवश्यक वाटतें.

## शहराचें मूळ केंद्र

पुणें शहराच्या परंपरागत इतिहासाप्रमाणें कसबें पुणें म्हणजे 'पुणेंवाडी,' 'कासारी' व 'कुंभारी' हीं तीन लहान गांवें मिळून झालेली वाडी होती. या कसब्याच्या पूर्वेस 'मुंजेरी' व 'माळी' अशीं दोन गांवें होतीं. तीं गांव वाढूं लागल्यावर त्यांतच सामावलीं गेलीं "( पुणें कुंभारी कासारी तीन गांव मोडून येक गांव केला." पुरंदरे दप्तर भाग ३, पृ. १२९). परंतु पुणें शहराच्या विकासाचा हा इतिहास प्रमाण मानतां येत नाहीं. हा इतिहास मान्य केल्यास साधारणपणें १ चौरस मैलाच्या क्षेत्रांत ५ गांवें अगर वाड्या पूर्वी वसलेल्या होत्या असें मानणें प्राप्त होतें. महाराष्ट्रांतील वाड्या व गांवें यांच्या वसाहतींचा इतिहास व क्रम लक्ष्यांत आणिल्यास ही गोष्ट जवळजवळ अशक्य अगर असंभवनीय कोटींतील ठरते. शिवाय वर जी गांवांची म्हणून नांवें दिलीं आहेत तीं गावांपेक्षा जमिनीच्या प्रकारांचीं नांवें असण्याचाच अधिक संभव दिसतो. माळी व मुंजेरी हे शब्द मराठी कागदपत्रांतून पुण्यासेरीज इतर शेकडों गांवासंबंधी वारंवार आलेले आहेत. कासारी म्हणजे प्रत न लावलेली जमीन असा अर्थ अगदी सरळ आहे. कुंभार वस्तीची अगर त्यांना सोईस्कर अशी जमीन ती कुंभारी असें ओघानेंच येतें व तें जास्त सयुक्तिकहि वाटतें. ( पहा: शिवचरित्र साहित्य, खंड ७, प्रस्तावना पृ. ११. )

उपलब्ध पुराव्याची छाननी करतां असें दिसतें कीं सध्याच्या कसबा पेठेच्या दक्षिण भागांत नदीपासून थोड्या अंतरावर असलेल्या उंचवट्यावर पुणें हें एक लहानसें गांव वसलेलें होतें. हा भाग म्हणजेच पुणें शहराचें मूळ केंद्र होय. गणपति व केदारेश्वर यांचीं देवळें याच भागांत आहेत. त्याचप्रमाणें पुण्याचे जुने वतनदार आठवले ब्राह्मण यांचींही घरें तेथेंच आहेत. प्रसिद्ध कसबा गणपतीचें देवालय शहरांत सर्वांत जुनें असून पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें तें बहुधा शहराच्या प्रवेशमार्गाजवळ असावें. ( डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिटयूटचे डॉ. सांखळीया यांनीं पूर्वीच्या शहररचनेसंबंधीं पाहणी करण्यांस आम्हांस मदत केली व माहितीही पुरविली याबद्दल गोखले अर्थशास्त्र संशोधन मंदिराचे चालक त्यांचे ऋणी आहेत.) केदारेश्वर हा देवही पुष्कळ जुना असावा असें कागदपत्रावरून दिसतें. ( पहा: शिवचरित्र साहित्य खंड, पृ. ६४–६८ ) पुणें शहराच्या वेशींपैकीं एकीस केदार वेस म्हणत, यावरून केदारेश्वराचें महत्त्व दिसून येईल. शहराच्या संरक्षक देवतांपैकीं केदारेश्वर असावा असें दिसतें.

## पुण्याचें स्थानमहात्म्य

या पुढचा प्रश्न म्हणजे पुणें गांव वसण्याचीं कारणें कोणतीं ? दक्षिणेंतील पूर्वीच्या कोणत्याही महत्त्वाच्या व्यापारी मार्गावर हें गांव पडत नाहीं. पुण्याच्या लगतच्या पश्चिम बाजूस कोंकणांत उतरण्यास सोइस्कर असा घाटही आढळत नाहीं. पूर्वेस सर्व देश मैदानवजाच आहे व त्यांतून जाणारे अगर निघणारे ऐतिहासिक काळांतील मोठे मोठे मार्ग पुण्यापासून बऱ्याच अंतरावर होते हें स्पष्ट दिसतें. पुण्याजवळ मुठा नदीला असलेला महत्त्वाचा उतार ( सध्याच्या दगडी पुलाजवळचा ) व तेथून लगतच्या पश्चिमेकडील मावळ भागांत जाण्याच्या रस्त्यावरील नाकें हेंच खरोखरी पुण्याचें स्थानमहात्म्य. वर उल्लेखिलेल्या दोन गोष्टींमुळें पुण्यास लष्करी महत्त्व प्राप्त झालेलें दिसून येतें व त्यास ऐतिहासिक कागदपत्रांचाही आधार मिळतो. १३ व्या शतकांत बऱ्या आरबानें पुण्याभोंवतीं कोट बांधला. पुणें हें लष्करी ठाणें झालें. कोटांत फक्त सैन्यासच राहण्यास परवानगी होती. उदीम व्यापारी हे कोटाबाहेर राहात असत. ( पहा : " कोट पांढरीचा नवीन बांधला कोटाचे भोंवतीं वस्ती दुर्गे व मोहतर्फा देशमूख व देशपांडे व स्थायी उपरी अदमी ऋग्वेदी ब्राह्मणाची घरे धर्माधिकारी यांची होती. गोळक सेटे व महाजन व्यवहारे यांची घरें होतीं." पुरंदरे दप्तर, भाग ३, पृ. १२८ ) मध्ययुगीन युरोपमधील शहरांच्या विकासक्रमाशीं याचें थोडेंबहुत साधर्म्य येथें पुष्कळ वाचकांस जाणवेल. पुणें शहराच्या विकासाचा पहिला टप्पा येथें संपतो.

१६३७ मध्यें उजाड आणि वैराण झालेलें पुणें जेव्हां शहाजींच्या ताब्यांत आलें तेथपासून दुसरा टप्पा सुरू होतो. त्यावेळीं पुणें शहराच्या ४ पेठा होत्या. नागझरी व मुठा यांच्या कोनांत असलेली कसबा पेठ; मुर्तजा निजामशहानें वसविलेली नदीकांठची मुर्तजाबाद अथवा शनिवार पेठ ( सन १६१० मध्यें या पेठेचा उल्लेख सांपडतो. पहा : शिवचरित्र साहित्य, पृ. ११३; ) मलिक अंबरानें वसविलेली मलकापूर अथवा रविवार पेठ ( पहा: पेशवे दप्तर, खंड २१, पृ. ४८७६ ) आणि नागझरीच्या कांठीं असलेली शहापूर उर्फ सोमवार पेठ. ( १६१० मध्यें या पेठेचा उल्लेख

सांपडतो. पहा : शिवचरित्र साहित्य, खं. १२, पृ. ११३. त्यावरून ही पेठ शहाजीनें वसविली अशी घडफळे यादींतील माहिती चुकीची ठरते. ) १६६३ मध्यें जेव्हां शास्ताखानानें पुणें घेऊन तेथें वस्ती केली तेव्हां त्यानें सोमवार पेठेच्या पश्चिमेस नागझरीच्या पूर्वतीरावर आस्तापुरा उर्फ मंगळवार पेठ वसविली. या काळापूर्वी सुद्धां तेथें अस्पृश्य वस्ती असावी असें दिसतें. शास्ताखानानें आपलें नांव त्या वस्तीस देऊन त्याची पेठ केली असावी एवढेंच. शिवाजीच्या वेळीं या पांच पेठांतच पुणें शहर सामावलें जात असे. यानंतर १७०३ मध्यें पुण्यास अवरंगजेबाचा तळ पडला होता. त्यावेळीं त्यानें कौल देऊन नवीन पेठ वसविली. ती म्हणजे मोहियाबाद अथवा बुधवार. (पहा : पेशवे दप्तर, खंड ३१, पृ. ४९२९ ).

## राजधानींत रूपांतर

पुणें शहराच्या वाढीचा तिसरा टप्पा त्याचें राजधानींत रूपांतर झाल्यावर अथवा तें होण्याच्या मार्गावर असतांना म्हणजे पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दीत होतो. १७२१ मध्यें बाजीरावानें बापूजी श्रीपत चित्राव यास पुण्याचा सुभेदार नेमलें व पुणें शहराची वाढ करण्याचें काम त्याच्यावर सोपविलें. १७३० मध्यें शनिवार वाडा बांधण्यांत आला. १७२८ मध्यें नदी कांठचें किल्ले हिसार हें ठाणें मोडून तेथें मुत्सद्दी लोकांस घरें बांधण्यास जागा दिली गेली. १७३४ मध्यें बाजीरावानें बुधवारच्या दक्षिणेस विसापूर उर्फ शुक्रवार ही पेठ वसवली. (पेशवे दप्तर, खंड ३०, पृ. ४८०३ ) बाळाजी बाजीरावानें ४ नवीन पेठा वसविल्या. १७५० मध्यें शुक्रवारच्या पूर्वेस व रविवारचे दक्षिणेस वेताळ पेठ वसविण्यासाठी कौल देण्यांत आला. (वाड रोजनिशी, खंड २, पृ. २१४) १७५५ त गणेश (पेशवे दप्तर, जमाव रुमाल १७२, अप्रसिद्ध ) व निहाल या दोन पेठा वसविण्यात आल्या. नारायण पेठ याच सुमारास वसविण्यांत आली. (पेशवे दप्तर, जमाव रुमाल १७४, अप्रसिद्ध ) ही पेठ शनिवार पेठेचाच एक भाग अलग काढून केलेली असावी असें वाटतें.

बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीत पर्वतीचें देवालय, पर्वतीचें तळें, कात्रजचा नळ, अंबिल ओढ्याचें परावर्तन, लकडीपूल वगैरे पुष्कळच शहराला उठाव देणारीं कामें झालीं. त्याच्या मनांतून शहराभोंवतीं नवीन कोट बांधावा असें होतें व त्याप्रमाणें काम चालीसहि लागलें होतें. त्याचे अवशेष अजूनहि पहावयास मिळतात. परंतु कांहीं कारणानें हें काम अपुरेंच सोडण्यांत आलें. यापूर्वीही शहरास कोट असावा असें वाटतें. १६३० मध्यें मुरार जगदेवानें जुना कोट पाडून टाकला होता. त्यानंतर केव्हांतरी हा कोट अस्तित्वांत आला असावा, असें दिसतें ( पहा : " पुण्याच्या कोटाच्या व शाहार दरवाजियाच्या किल्या रा. हरिपंत यांजवळ आहेत " असें बापूजी श्रीपत १७२९ मध्यें बाजीरावास लिहितो. पेशवे दप्तर, खंड ३०, पृ. ४४९६–९७. ) परंतु तत्संबंधीं अधिक माहिती मिळत नाहीं. बाळाजीचे कारकीर्दीत (१७४६ मध्यें) मंगळवार पेठेबाबत पुढील उल्लेख आढळतो. " थल आस्तापूर पेठ होती ते खराब पडली ते जमीन माळी याचे दुमाले करून " इ. (पेशवे दप्तर, जमाव रुमाल नं. १७८, अप्रसिद्ध ) परंतु १७६५–६६ मध्यें ही पेठ पुन्हां अस्तित्वांत असावी असें पेशवे रोजनिशींतील उल्लेखांवरून वाटतें. ( वाड रोजनिशी, खंड ७, पृ. ३६९ ). थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीत भवानी व सदाशिव या दोन पेठा वसविल्या गेल्या. सदाशिव पेठ १७६९ मध्यें वसविली गेली ( पेशवे दप्तर, जमाव रुमाल नं. १७४, अप्रसिद्ध ) व भवानी पेठेला १७६७ मध्यें कौल दिल्याचा उल्लेख आहे ( वाड रोजनिशी, खंड ७, पृ. ३७९ ) पेशवे दप्तरांतील १७६८ च्या कागदांतून मुझफरगंज पेठ असाही उल्लेख आढळतो. परंतु त्यासंबंधीं जास्त माहिती मिळत नाहीं.

## वैभवाचा कळस

सवाई माधवरावाच्या राज्यारोहणापासून पुण्याच्या वाढीचा चवथा टप्पा सुरू होतो. या काळांत पुण्याच्या वैभवाचा कळस झाला. सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत रास्ता, नाना व घोरपडे या तीन नवीन पेठा वसविल्या गेल्या. १७९१ मध्यें घोरपडे पेठ वसविल्याचा उल्लेख सांपडतो. ( पेशवे दप्तर, खंड ३१, पृ. ४९९५ ) रास्ता उर्फ शिवपुरी पेठ १७८३ मध्यें वसविण्यांत आली. ( पेशवे दप्तर, जमाव रुमाल नं. १७६, अप्रसिद्ध ). १७८९ मध्यें नाना उर्फ हनुमंत पेठेस कौल देण्यांस आला. ( वाड रोजनिशी, खंड ७, पृ. ३५७. ) सवाई माधवरावानें १७८५ मध्यें नवपुरा नांवाच्या नवीन पेठेस कौल दिला असें त्याच्या रोजनिशींत नमूद आहे. ( वाड रोजनिशी, खंड ८, पृ. ३५४ ) ही पेठ भवानी पेठेच्या पूर्वभागीं होती असें कौलनाम्यांतील उल्लेखावरून दिसतें. परंतु पुढें या पेठेचा कांहींच ठावठिकाणा कागदपत्रांतून सांपडत नाहीं.

१७८२ मध्यें पुणें शहरांतील सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी जमिनीखालून पक्क्या मोऱ्या (ड्रेनेज) बांधण्यांत आल्या. १७७८ त रास्ते यांनीं कोंढव्याहून नळ बांधून शहरांत पाणी आणलें. १७९० मध्यें नाना फडणीस यांनीं व नंतर रुपराम चौधरी यांनीं सदरहूप्रमाणेंच नळ बांधून पाणी शहरांत आणण्याची व्यवस्था केली. रावबाजीच्या कारकीर्दीत नवीन पेठांची वसाहत झालेली दिसत नाहीं. १८०४ मध्यें नरसीपुरा नामक पेठेस कौल दिल्याचा उल्लेख त्याच्या रोजनिशींत आहे ( वाड रोजनिशी, खंड ४ आहे. पृ. २८० ) व पुढें १८१० मध्येंही या पेठेचा उल्लेख आढळेल व ( कित्ता. पृ. २९७. ) परंतु पुढच्या काळांत त्यासंबंधीं कांहीं माहिती मिळत नाहीं. सदाशिव पेठेंतील नरसोबाच्या देवळाच्या आसपास ही पेठ असावी व पुढें ती सदाशिव पेठेंतच सामील केली गेली असावी असें वाटतें. रावबाजीनें पुणें शहरांत पांच सहा सरकारी वाडे बांधले. पुणें शहर सुधारण्याचें व त्यास शोभा आणण्याचें त्याच्या मनांत फार होतें असें इंग्रजांचा पुण्याचा वकील क्लोज यानें नमूद करून ठेविलें आहे. तो लिहितो,

" His Highness continued to be very talkative and spoke to me of his plans for the improvement of Poona by planting trees, erecting Choultries, building garden houses, etc. His Highness expressed a great desire to build a house in the English style." ( Poona Residency Correspondence, Vol. VII, Letter No. 1784, Dated 27-6-1805 ).

यानंतर पुणें शहरास लष्कर हा भाग १८१८ मध्यें नवीन जोडण्यांत आला. १८०३ मध्यें वेलस्लीनें जेव्हां पुणें घेतलें तेव्हां त्यानें ब्रिटिश लष्करासाठीं सोईची म्हणून गारपीराजवळची जागा निवडली व खडकीच्या लढाईपर्यंत ब्रिटिश फौजा तेथेंच रहात असत. यानंतर १९ व्या शतकाच्या अखेरपर्यंत पुणें शहराची महत्त्वाची अशी वाढ झालेली आढळत नाहीं. त्यानंतरचा इतिहास बहुतेकांच्या परिचयाचा आहेच.

## हिंदुस्थानांतील ग्रंथालयांची युद्धोत्तर पुनर्घटना

आतांपर्यंत आपल्या देशांत ग्रंथालयांची अत्यंत आबाळ झालेली असल्यामुळें ग्रंथालयांच्या पुनर्घटनेच्या ऐवजी त्यांची पाश्चिमात्य देशांच्या तोडीची संघटना करण्याचें कार्य आपण प्रथम हातीं घेतलें पाहिजे. अखिल जगांत सध्या ज्या विलक्षण व कल्पनातीत उलाढाली चालू आहेत त्यांना सतत चालना देण्याचें काम छापखान्यांतून हरघडी बाहेर पडत असलेलें वाङ्मय करीत आहे. सर्व जगांत प्रथम श्रेणींत असलेल्या मॉस्को येथील सोव्हिएट् यूनियनच्या ग्रंथालयांतील ग्रंथांची संख्या सध्या शहाण्णव लक्ष (९६,००,००० ) आहे हें विधान आमच्या देशांतील वाचकांना निखालस खोटें आहे असें वाटण्याजोगी आमच्या देशांतील ग्रंथालयांची अगदी शोचनीय स्थिति आहे. युनायटेड स्टेट्सच्या काँग्रेस लायब्ररींत प्रतिवर्षी दोन लाखांवर ग्रंथांची भर पडते हें विधान सुद्धां असेंच आम्हांस आश्चर्यचकित करणारें आहे. आमच्या देशांतील सर्वांत मोठें ग्रंथालय म्हणजे कलकत्त्याची इंपीरियल लायब्ररी. त्या ग्रंथालयाची एकंदर ग्रंथसंख्या सध्या जवळ जवळ चार लाखांपर्यंत ( ४,००,००० ) पोहोंचली आहे. लाख–दोन लाख ग्रंथ असलेलीं ग्रंथालयें आपल्या देशांत अगदी बोटावर मोजण्याजोगीं आहेत व तीं सुद्धा जेमतेम कशींतरी चालू आहेत. ह्या बाबतींत एकंदर समाज व सरकार हीं अगदीं झोपीं गेलेलीं आहेत, असें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं. एखादा ॲन्ड्र्यू कार्नेजी आमच्या देशांत केव्हां जन्माला येईल कोण जाणें! पण सर्व पुनर्घटनेचा पाया जें "ज्ञान व शीलसंवर्धन" तें नीट होत नसेल तर इतर सर्व पुनर्घटना फोल आहे. सार्जेंट कमिटीच्या अहवालाप्रमाणें शिक्षणाची पुनर्घटना परिणामकारक करण्यास व बीव्हरीज योजनेप्रमाणें समाजाला चिर-स्वास्थ्य मिळवून देण्यास ग्रंथालयांचा प्रश्न प्रथम हातीं घेतला पाहिजे. ह्या महत्वाच्या प्रश्नाचा उहापोह मद्रास विश्वविद्यालयाचे विख्यात ग्रंथपाल रावसाहेब रंगनाथन, एम्. ए., एल. टी., एफ. एल. ए. ह्यांनीं आपल्या ताज्या ३६ पानी पुस्तिकेंत* उत्तम प्रकारें केलेला आहे. त्यांच्या कल्पनेप्रमाणें, ग्रंथालयांच्या प्रसाराकरितां प्रतिवर्षी एकंदर १४ कोटि रुपये खर्च करावे लागतील. हा आकडा ठरवितांना त्यांनीं १० वर्षांवरील हिंदुस्थानांतील लोकसंख्या अदमासें २८ कोटि धरली आहे व प्रत्येक माणसाकरितां प्रतिवर्षी आठ आणे प्रमाणें ग्रंथालयांप्रीत्यर्थ खर्च धरला आहे. त्यांच्या मतें हिंदुस्थानांत जेव्हां एकंदर ग्रंथसंख्या २८ कोटि होईल, म्हणजे प्रत्येक १० वर्षांवरील मनुष्यागणिक एक पुस्तक या प्रमाणांत ग्रंथसंख्या असेल, तेव्हांच ग्रंथालयांचा प्रसार चांगला झाला असें म्हणतां येईल. त्यांनीं ग्रंथांच्या संख्येचे व ग्रंथलयांकरितां होणाऱ्या खर्चाचे तुलनात्मक आकडे पुढीलप्रमाणें दिलेले आहेत. ते वाचकांना उद्बोधक व मनोरंजक वाटतील अशी आशा आहे.

ह्या थोड्याशा माहितीमुळें ह्या महत्त्वाच्या विषयाकडे सुज्ञ वाचकांचें लक्ष वेधलें जाईल व त्याबद्दल विचारविनिमयाला चालना मिळेल अशी खात्री वाटते.

*"Post-War Reconstruction of Libraries in India" (Published by the Punjab Library Association, Forman Christian College, Lahore, Price Re. 1.)

### ग्रंथालयांतील पुस्तकें व त्यांवरील खर्च

**प्रत्येक मनुष्यागणिक ग्रंथालयांवरील वार्षिक खर्च**

| | |
|---|---|
| इंग्लंड | १ रुपया |
| अमेरिका | २ रुपये |
| बडोदें | १ आणा |
| हिंदुस्थान | १ पै चा कितवा हिस्सा असावा बरें ? |

**ग्रंथांची संख्या**

| | |
|---|---|
| इंग्लंड | २,८०,००,००० |
| अमेरिका | ६,८०,००,००० |
| बडोदें | १९,००,००० |
| मद्रास | १०,००,००० |
| हिंदुस्थान | ? |

**दरमाणशी ग्रंथांची संख्या**

| | |
|---|---|
| नॉर्वे | ३ |
| स्वीडन | १ १/२ |
| इंग्लंड | १/२ |
| अमेरिका | १/२ |
| बडोदें | १ १/२ |
| हिंदुस्थान | १/१० पेक्षा कमी |

### दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेची, महाराष्ट्रीय डायरेक्टरांचे नेतृत्वाखालीं श्री. डी. डी. देशपांडे ह्यांनीं १९३७ सालीं स्थापना केली, तेव्हां तिचा विस्तार एवढ्या अल्पावधींत, इतका मोठा होईल, अशी कल्पना नव्हती. सहा वर्षांत तिचें खेळतें भांडवल १½ कोटि रुपयांवर गेलें आहे व रोख वसूल भांडवल आणि रिझर्व्हज ह्यांचा आकडा ८ लक्ष, १० हजार रुपयांहून अधिक झाला आहे. बँकेच्या खातेदारांची संख्या १०,००० झाली आहे आणि ३० शाखांचे मार्फत बँक महाराष्ट्रभर व्यवहार करीत आहे. अकोला, चांदा, बेलापूर रोड, कोपरगांव, इत्यादि ठिकाणीं तिच्या शाखा लवकरच निघणार आहेत. गेल्या वर्षी बँकेस १ लक्ष, २२½ हजार रुपये निव्वळ नफा झाला. प्रेफरन्स भागीदारांना प्रारंभापासून आजतागायत ५% डिव्हिडंड मिळालें आहे. ऑर्डिनरी व डिफर्ड भागीदारांसहि त्यांच्या भागांवर १९४३-४४ साळाकरितां अनुक्रमें ५% व ६% डिव्हिडंड देण्यांत आलें आहे व त्या आधीच्या सर्व वर्षांचें डिव्हिडंडहि त्यांच्या वांटणीस आलें आहे. बँकेस ९,०३,१७५ रुपयांचे भाग विकण्यास परवानगी मिळाली आहे. बँक प्रत्येक भागाच्या २५ रुपयांपैकीं १२½ रुपये वसूल करणार आहे व ३ रुपये वाढावा घेणार आहे. ह्या वाढाव्यांतून दलाली व कमिशन भागवून उरलेली रक्कम रिझर्व्हजमध्यें टाकली जाईल. बँकेच्या प्रगतीचा वेग लक्षांत घेतां, तिची आणखी पुष्कळच वाढ लवकर होण्याचा रंग दिसतो व त्याचें श्रेय मॅनेजिंग डायरेक्टर श्री. देशपांडे ह्यांची कळकळ, चिकाटी व दीर्घ प्रयत्न ह्यांसच दिलें पाहिजे. पुणें शाखेचे मॅनेजर श्री-डी. एन. गांडेकर, बी. ए. एलएल. बी., हे असून त्यांनीं ही शाखा थोड्या अवधींत लोकप्रिय केली आहे.

# दि बँक ऑफ सिटिझन्स लि० बेळगांव.

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकांतील प्रमुख बँक.

सर्व तऱ्हेचा बँकिंग व्यवहार केला जातो.

मुख्य कचेरीः–१५१४ मारुतीगल्ली, बेळगांव.

शाखाः—

१ चव्हाण बिल्डिंग, सराफकट्टा, गणपतगल्ली बेळगांव.
२ खानापूर ३ नंदगड ४ अळणांवर
५ धारवाड ६ निपाणी ७ चिक्कोडी
८ कँप–बेळगांव ९ टळकवाडी.

ऑफिस टाईमः—सकाळीं ९॥ ते १२, दुपारीं ३॥ ते ६

समक्ष भेटा अगर लिहा.

जी. डी. सराफ,
मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि बँक ऑफ औंध लिमिटेड, औंध.

( औंध संस्थानांत स्थापन झालेली व सभासदांची जबाबदारी नियमित असलेली )

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. श्रीपाद प्रभाकर ओगले ( चेअरमन )
श्री. ना. रामप्पा बाळप्पा बिद्री.
श्री. दि. ब. मोतीलाल बालमुकुंद मुथा
श्री. शंतनुराव लक्ष्मणराव किर्लोस्कर
श्री. देवी माधवदास रामदास

मांडवल

| | |
|---|---|
| अधिकृत मांडवल .... ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें मांडवल | रु. २,५०,००० |
| भरलेलें मांडवल ... .. | रु. १,३७,९६० |

● सेव्हिंग्ज, चालू व मुदत ठेवी योग्य व्याजानें स्वीकारण्यांत येतात.

● ३ वर्षे मुदतीचीं कॅश सर्टिफिकिटें रु. १०, ५०, १००, १००० या रकमेचीं विकलीं जातात.

◆ सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

बा. रा. वर्तक,
जनरल मॅनेजर.



# दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखा:—(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती (३) लोणावळा (४) बेलापूर.

पे–ऑफिसः–खोपोली (जि, कुलाबा)

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

एकूण खेळतें मांडवल : रु. २५ लाखांचे वर.

— व्याजाचे दर —

करंट अर्धा टक्का, सेव्हिंग्ज २ टक्के, सेव्हिंग्ज (स्त्री खातेदार) २½ टक्के, कायम ठेवी २¾ ते ४¾ टक्केपर्यंत ( मुदत ६ मांहिने ते ५ वर्षे )

★ सेव्हिंग्ज खात्यांतील रकमा चेकनें काढतां येतात.

★ शॉर्ट टर्म डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.

★ बँकेचे मुख्य कचेरींत स्त्री खातेदारांकरितां स्वतंत्र स्त्री विभागाची व्यवस्था.

★ सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

जास्त माहितीसाठीं मुख्य कचेरी अगर शाखा यांजकडे चौकशी करा.

आर. बी. साळवेकर, B. A., LL. B.,
एन. एन. क्षीरसागर.
} मॅनेजिंग डायरेक्टर्स.



# एक हजार रुपये

★ दरवर्षी दिवाळी पाडव्याला रुपये एकशे चाळीस प्रमाणें फक्त पांच वर्षें हप्ते देऊन, म्हणजे एकंदर रुपये सातशें फक्त भरून, एक हजार रुपये रकमेचा विमा ( नफ्यासह ) घेतां येईल.

विमा हप्त्यादाखल भरलेल्या रकमेवर इन्कम टॅक्स माफ होतो. तपशील मागवा.

आमचे विमेदारांना व भागीदारांना नवें वर्ष सुखाचें व समृद्धीचें जावो.

# दि ट्रस्ट ऑफ इंडिया अश्युअरन्स कं. लि., पुणें.

अध्यक्ष :–श्रीमंत जगन्नाथ महाराज पंडीत

मॅनेजरः–व्ही. एच. देशमुख, बी. ए.

शाखाः–मुंबई, नागपूर, सोलापूर, बेळगांव इ.

## रशिया व अमेरिका ह्यांचे संबंध आजवर कसे होते; पुढें कसे रहातील ?

रशिया व अमेरिका ह्यांचे अमदीं पूर्वींचे संबंध फारसे सलोख्याचे नव्हते. एंप्रेस कॅथराइननें आपणांस अमेरिकेचा वकील म्हणून मान्यता द्यावी, ह्यासाठी फ्रान्सिस डानानें सेंट पीटर्सबर्गमध्यें १७८१ ते ८३ हीं दोन वर्षें काढलीं, त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पंचवीस वर्षांनंतर प्रेसिडेंट जेफरसननें झार पहिला अॅलेक्झँडर याजकडून अमेरिकेच्या वकिलातीस मान्यता मिळवली, परंतु अमेरिकन सेनेट वकील नेमण्यास तयार झालें नाहीं ! युरोपांतील भानगडींत अमेरिकेनें शिरूं नये, हें तत्त्व त्याच्या बुडाशीं होतें. रशिया व अमेरिका ह्यांचे हितसंबंध परस्पर विरोधी नव्हते, इतकेंच नव्हे त्यांचा एकमेकाशीं कांहीं संबंधच नव्हता, हें त्यावरून स्पष्ट होतें. क्रायमिन युद्धाचे वेळीं, रशिया हा ग्रेटब्रिटनचा शत्रू होता ह्यासाठींच केवळ अमेरिकेचें लोकमत रशियास अनुकूल होतें, व अमेरिकेंतून ब्रिटिश वकीलास बाहेर घालवून तें लोकमत अमेरिकन सरकारनें व्यक्त केलें. अमेरिकन सिव्हिल वॉरचे वेळीं रशियानें उत्तर अमेरिकेचे बाजूनें आपला कल दाखविला, कारण इंग्लंड दक्षिणकडील लोकांना अनुकूल असल्याचा ग्रह सर्वत्र झालेला होता. ग्रेट ब्रिटन रशियावर स्वारी करून रशियन आगबोटींची नाकेबंदी करणार ह्या अपेक्षेनें रशियानें १८६३ सालीं आपल्या आगबोटी न्यूयॉर्क व सॅनफ्रॅन्सिस्को ह्या बदरांकडे आश्रयार्थ पाठविल्या, त्यावेळीं अमेरिकन लोकांना रशियाबद्दल जास्तच स्नेह वाटूं लागला. वास्तविक ग्रेट ब्रिटन अटलांटिक महासागराच्या क्षेत्रांत मातब्बर होऊं नये, ह्यासाठींच केवळ रशिया व अमेरिका हे सान्निध येऊं लागले होते. परंतु १९ व्या शतकाचे अखेरीस चीनमधील धोरणाबाबत त्या दोन देशांत मतभेद निर्माण झाले. अमेरिकेला चीनमध्यें खुला व्यापार हवा होता, तर रशियाला मंचुरियामध्यें एकट्यासाठीं सवलती पाहिजे होत्या. रशिया व जपान ह्यांचेमध्यें युद्ध सुरू झालें, तेव्हां अमेरिकेस जपानची सरशी हवी होती तर जपानच्या पाठीमागील अमेरिका हाच रशियाचा खरा शत्रू असल्याचें रशियन वृत्तपत्रें सांगत होतीं ! १९१७ सालीं रशिया व अमेरिका हीं पुनः एकमेकांचे मित्र बनलीं, व झारशाहीचा नाश झाल्यावर रशिया हा देश मान्यवर राष्ट्रांच्या बैठकींत बसण्यास लायक बनला, असें प्रेसिडेंट रूझवेल्टनें जाहीर केलें. हा सलोखा फार काळ टिकला नाहीं, कारण बोल्शेविक बागुलबोवानें अमेरिकन लोकमत पुनरपि रशिया-विरोधी केलें.

अमेरिकेला बोल्शेविक राजवटीबद्दल सहानुभूति कधीच वाटली नाहीं व केवळ आर्थिक स्वार्थासाठीं, मंदीच्या काळांत व्यापार वाढविला पाहिजे ह्याकरितां, अमेरिकेनें सोव्हिअट राजवटीस पुढें मान्यता दिली. जर्मनीच्या वाढत्या बळाचा परिणाम वास्तविक पहातां अमेरिका व रशिया ह्यांची गट्टी वाढण्यांत व्हावयास हवा होता, परंतु युरोपियन लोकवस्तीनें देशांतर करण्यांतच तिचें हित आहे, असें अमेरिकेनें धोरण स्वीकारलें. १९३९ चा रशिया व जर्मनी ह्यांचेमधील करार व फिनलंडशीं रशियाचें युद्ध ह्यामुळें कम्युनिस्टांविरुद्ध अमेरिकेंत वातावरण निर्माण झालें. अमेरिकेचें मागील महायुद्धासंबंधांतील देणें फिनलंडखेरीज बाकी सर्व राष्ट्रांनीं बुडविलें होतें, ह्याची आठवण अमेरिकन लोकांस सहाजीकच झाली. जर्मनीनें रशियावर स्वारी केली, तेव्हां, " रशियापेक्षा जर्मनीचाच जय झालेला बरा; कम्युनिझमपेक्षा फॅसिझम बरा " असेंच अमेरिकेंतील साधारण लोकमत होतें. परंतु, त्यानंतर सहाच महिन्यांनीं रशिया व अमेरिका हीं दोस्तराष्ट्रें बनलीं.

अटलांटिक महासागराच्या बाजूस दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्राची मातब्बरी होऊं नये, एवढ्यासाठी रशियास जवळ करणें, हें अमेरिकेचें धोरण होतें. १९ व्या शतकांत इंग्लंडविरुद्ध तो प्रयोग झाला; आतां जर्मनीविरुद्ध तो प्रयोग मोठ्या प्रमाणावर चालू आहे. प्रत्यक्ष रशियाच फार प्रबळ होऊन त्याची अमेरिकेशीं जाचक स्पर्धा होऊं लागली, तर रशियाविरुद्ध एक संघ निर्माण करण्यास अमेरिका मागेपुढें पहाणार नाहीं. रशियाला युरोपचे बाहेर कांहीं महत्त्वाकांक्षा नसल्यास इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांच्या रशियाविरुद्ध तक्रारीस अमेरिका जुमानणार नाहीं, हें तितकेंच खरें आहे. पॅसिफिक महासागरांतच अमेरिका व रशिया ह्यांचा खरा शेजार आहे व चालू युद्धाच्या अखेरच्या काळांत पॅसिफिकमधील हालचालींवरच अमेरिकेचें जास्त लक्ष लागून रहाणार हें उघड आहे. जपानचा कायमचा पराभव व्हावा, ह्याबद्दल अमेरिका कसून प्रयत्न करील आणि जपानला पूर्व आशियांत कोणी तरी प्रतिस्पर्धी रहावा अशीहि खटपट करील. रशिया पॅसिफिक महासागरांतील युद्धांत उतरला नाहीं व त्याचे चीनशीं संबंध सध्यासारखेच थोडे ताणलेले राहिले तर रशिया-अमेरिका सलोखा सध्यासारखा रहाणार नाहीं. वरीलप्रमाणें मतें अमेरिकेंतील एका ब्रिटिश वार्ताहारानें प्रसिद्ध केलीं आहेत. चीन फारच लंगडा झाला व रशिया आशियांत फार प्रबळ झाला, तर अमेरिकेपुढें पेंच निर्माण होईल. थिओडर रुझवेल्टनें १९०२ सालीं रशियाविरुद्ध जपानची बाजू उचलली व १९०५ सालीं रशियाला जपानविरुद्ध उचलून धरलें तशीच परिस्थिति निर्माण व्हावयाची! अमेरिकेची आजची इच्छा चीनची शक्ति वाढवून त्यास जपानचा प्रतिस्पर्धी म्हणून तयार करण्याची आहे, परंतु चीन ढेपाळला तर वर सांगितल्याप्रमाणें परिस्थिति होणें असंभव नाहीं. रशिया व अमेरिका ह्यांचा मध्यस्थ म्हणून इंग्लंडची भूमिका राहील, अशी कित्येकांची अपेक्षा आहे, परंतु ती फोल आहे, असें ब्रिटिश वार्ताहाराचें मत आहे.


# मा धवा श्र म

हा आश्रम ट्रामच्या रस्त्यावर असून रेल्वे स्टेशन व चौपाटी फक्त पांच मिनिटांचे रस्त्यावर आहे.

कुटुंबासह राहण्याची इच्छेनुरूप स्वतंत्र व्यवस्था.

माधवाश्रम बिल्डिंग ★ गिरगांव, मुंबई.

## सहकारी कंझूमर्स स्टोर्स

सध्याच्या युद्धजन्य अन्नपरिस्थितीनें सहकारी कंझूमर्स स्टोर्स चळवळीस जोराची चालना दिलेली आहे. रोजच्या गरजा भागविण्यासाठी जिनसा मिळविणें हें गरीब व श्रीमंत ह्या दोघांसहि सारखेंच त्रासदायक झालें असल्यामुळें संघटनेची आवश्यकता निर्माण झाली आहे. युरोपांतील स्टोर्सच्या संघटनेचे मानानें हिंदुस्थानांतील संघटना, प्रत्येक प्रांतांत आतां अनेक स्टोर्स कुत्र्याच्या छत्र्यांप्रमाणें उदयास आले असले तरी, अत्यंत प्राथमिक अवस्थेंत आहे. ह्या स्टोर्सची व्यवस्था कार्यक्षम झाली नाहीं तर ते अल्पजीवी ठरून बंद पडण्याची वेळ आल्यास आश्चर्य नाहीं.

सहकारी कंझूमर्स स्टोर्सचा कारभार अगदी लोकशाही तत्त्वावर चालतो:—(१) प्रत्येक सभासदागणिक एक मत, (२) सभासदांप्रमाणें बिगर सभासदांसहि बाजारभावानें मालविक्री, (३) भागीदारांस डिव्हिडंड व (४) खरेदीदारांस त्यांच्या खरेदीच्या प्रमाणांत बोनस. नफेबाजी करणें हा कंझूमर्स सोसायट्यांचा उद्देश नाहीं. घाऊक व्यापारी व किरकोळ दुकानदार ह्यांच्या नफेबाजीपासून स्वतःचें त्या संरक्षण करतात. व्यापाऱ्यांचे खिशांत साधारणतः जाणारा नफा त्या खरेदीदारांस मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. स्वतःची घटना व नियम ह्यांचे विशिष्ट चौकटींतच त्यांना व्यवहार करतां येतो आणि अंतर्गत व बाहेरील अनेक निर्बंध व तपासण्या ह्यांची मर्यादा त्यांस संभाळावी लागते. ह्याउलट, व्यापारी लोकांचें ध्येय फक्त एकच असतें, तें म्हणजे नफा मिळविणें. त्यांना घटना माहीत नाहीं व त्यांच्या फायद्याचे प्रमाणास मर्यादाहि पण नसते.

कंझूमर्स सोसायटी खरोखरच यशस्वी करावयाची म्हटली, तर तिची व्यवस्था अगदी सोपी नसते. सोसायटीचें व्यापक उच्च तत्त्व ज्यांस पटलें आहे व जे आपला वेळ व शक्ति तिचेसाठी खर्चण्यास तयार आहेत, अशा उत्साही लोकांनीं पुढाकार घेतला पाहिजे. त्यांना व्यापारी भानगडी करण्यांत निष्णात असलेल्या धंदेवाइकांशीं टक्कर द्यावयाची असते. तथापि स्वच्छ माल, बिनचूक वजन आणि सतत कडी देखरेख ह्या गुणांवर सहकारी स्टोर्स निश्चित यशस्वी होतील.

उधारीचा व्यवहार सहकारी कंझूमर्स स्टोर्सच्या ध्येयांशीं अगदी विसंगत आहे. सभासदांमध्यें कोणताही भेदाभेद मानावयाचा नाहीं, हें एकदां ठरलें म्हणजे उधारीचा प्रश्नच शिल्लक राहत नाहीं. त्यामुळें महिन्याच्या खरेदीपुरतें भांडवल असलें म्हणजे पुरतें.

Telephone : 31034 two lines
SARDA
THE PREMIER &
For High Class Hindus, Chiefs and Sardars
CENTRA
Near CRAWFO

### सोसायटीशीं एकनिष्ठ रहा

सहकारी स्टोर्सची संघटना यशस्वी होणें प्रत्येक सभासदानें आपल्या सोसायटीवरील निष्ठा कायम राखण्यावर अवलंबून असतें. बाजारभावापेक्षाहि एखादे वेळीं सोसायटीचा माल महाग वाटला तरी विचार न करतां सोसायटीस दोष देऊं नये. उधारी, मालाची घरीं पोंच व दिखाऊ स्वस्त भाव इत्यादि व्यापाऱ्यांच्या आकर्षणांस सभासदांनीं भुलून जाऊं नये. भुइमूग, तेल, मीठ, पोहे, घने इत्यादि जिन्नस बहुतेक दुकानदार मापी हिशेबानें देतात व त्यामुळें ते त्यास स्वस्त देणें परवडतें. सोसायट्यांत ते वजनावर विकले जातात त्या कारणानें त्यांची किंमत सकृत्दर्शनीं जास्त वाटते. ज्या सभासदांस ह्या फरकाचें कारण समजून घेण्याचाहि धीर नाहीं, ते ह्या दिखाऊ दुकानदारांकडे धाव घेतात. आमचे "बाबूराव बोबडे" शहराच्या दुसऱ्या टोकाशीं असलेल्या दुकानाच्या पाटीवर स्वस्त किंमती वाचून, आपल्या मोटारींत पेट्रोल भरून तिकडे जातात, माल खरेदी करतात आणि सोसायटीच्या सेक्रेटरीकडे येऊन मोठ्या ऐटींत आपल्या हुशारीचें प्रदर्शन करतात. परंतु, सोसायटीच्या तराजूंत त्याचें वजन करतां, सोसायटीच्या दुकानांत त्यांस मिळाला असता त्यापेक्षां पुष्कळच कमी माल त्यांचे पदरांत पडला आहे, असें त्यांस आढळतें. आपण आपला वेळ, शक्ति व पेट्रोल हीं निष्कारण खर्च केलीं, असें त्यांस अखेर समजून येतें व खरेदीवर वर्षअखेर मिळणाऱ्या बोनसलाहि ते मुकतात. असे "बाबूराव बोबडे" पुष्कळ आढळतात !

सोसायटीचें ध्येय व उद्दिष्ट हीं स्वतः समजून न घेतां तिचे-

व्ही. पी. बेडेकर


आणि सन्स
लिमिटेड
मुंबई.
मसाल्याचे
व्यापारी
पुणें एजंट:—
द. ना.
हजीब

उदबत्तीचे कारखानदार
राजदरबारी—कस्तुरी अंबर नं. १०१०, १

Telegram : " Sardargriha."

GRIHA

DEST HOTEL

fitted with latest equipments, Bath, Lift etc.

TUATED

RKET. BOMBAY 2.

वर निष्कारण टीका करून बभ्रा करण्याची सभासदांनीं घाई करूं नये. एकादी तक्रार करणें असल्यास, त्यांनीं व्यवस्थापक मंडळाकडे ती लेखी करावी. सभासदास कांहीं बाबी अगदी क्षुल्लक वाटत असल्या तरी त्या संबंधांतहि त्यांनीं व्यवस्थापक मंडळाशीं सहकार्य करावें. सभासदांस ठरवून दिलेल्या दिवशींच (१) त्यानें स्टोअरमध्यें जाणें, (२) बरोबर रेशन कार्ड नेणें, (३) जवळ मोड बाळगणें व (४) खरेदी केलेल्या जिनसासाठी पिशव्या नेणें, ह्या गोष्टी व्यवस्थेशीर व्यवहाराच्या दृष्टीनें फार सोईच्या होतात. सभासदानें बिल करण्याची स्वतःच तयारी दाखविणें, स्वतःच्या जिनसांचें वजन स्वतः करणें व रेशन कार्डांत नोंद करणें, ह्या गोष्टींमुळें सहकारी स्टोअरचें सहकारी स्वरूप ज्यास्तच उठावदार होईल.

त्रिप्लिकेन सहकारी सोसायटी ( मद्रास ) ही हिंदुस्थानांतील नमुनेदार कंझ्यूमर्स सोसायटी गणली जाते. कांहीं उत्साही शिक्षकांनीं तिची १९३० सालीं स्थापना केली. सोसायटीच्या आतां ३४ शाखा असून त्यांत सर्व तऱ्हेचा माल ठेवण्यांत येतो. माल सांठविण्यासाठी दोन मोठीं, कोठारें बांधण्यांत आलीं आहेत. मालाच्या वहातुकीसाठी कित्येक लॉऱ्या दिवसभर ये-जा करीत असतात. सोसायटीमार्फत एक ग्रन्थालयहि चालविण्यांत येतें. तसेंच, कापड विक्रीचीहि शाखा सोसायटीस जोडलेली आहे. सोसायटीच्या मासिक व्यवहाराची रकम कित्येक लक्ष रुपयांचेवर आहे.

मालांतील भेसळ थांबवून आरोग्य सुधारणारी, बरोबर वजन देऊन योग्य किंमत घेणारी व आपल्या उदाहरणानें समाजास वळण लावणारी निदान एक तरी कंझ्यूमर्स सोसायटी हिंदुस्थानांतील प्रत्येक गांवांत स्थापन होऊन यशस्वी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करणें फाजील आशा दाखविण्यासारखें होणार नाहींना !

## रिझर्व्ह बँकेकडील सरकारी बिनव्याजी ठेवी

मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचे त्यांच्या रिझर्व्ह बँकेच्या खात्यांत किती पैसे असतात ह्याची कल्पना खालील आंकड्यांवरून येईल. १९४२–४३ अखेर मध्यवर्ती सरकारचे रिझर्व्ह बँकेंत १७ कोटि, ४१ लक्ष रुपये होते. १९४३–४४ अखेर त्याचा आंकडा ८३ कोटि, ४९ लक्ष रुपयांवर गेला ! १९४२-४३ मध्यें दर महिन्याच्या अखेर मध्यवर्ती सरकारचे रिझर्व्ह बँकेंत सरासरीनें १२ कोटि, १० लक्ष रुपये होते, १९४३–४४ मधील तत्सम सरासरी ३० कोटि, २५ लक्ष रुपये होती.

| १९४३–४४ माहिना अखेर | मध्यवर्ती सरकार ( कोटि रु. ) | प्रांतिक सरकार ( कोटि रु. ) |
|---|---|---|
| एप्रिल | १२·६७ | १५·२५ |
| मे | ९·६८ | ८·२८ |
| जून | ८·३९ | १०·०३ |
| जुलै | १८·९९ | ९·१४ |
| ऑगस्ट | २१·२५ | ७·७७ |
| सप्टेंबर | २१·५२ | १२·४४ |
| ऑक्टोबर | २६·७४ | १२·६२ |
| नोव्हेंबर | ५६·८० | ९·४८ |
| डिसेंबर | १२·५९ | ९·९० |
| जानेवारी | ३९·७५ | १८·१३ |
| फेब्रुवारी | ५१·१४ | १६·५६ |
| मार्च | ८३·४९ | २४·७२ |
| सरासरी | ३०·२५ | १२·८६ |

सरकारचीं बँकिंगविषयक सर्व कामें रिझर्व्ह बँकेनें केलीं पाहिजेत, असें तिचेवर बंधन आहे. भारतमंत्री, मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकारें व त्यासंबंधांत मान्यता दिलेलीं संस्थानें, ह्यांचे पैसे स्वीकारून, त्या पैशाच्या मर्यादेंत ते त्यांस मागणीप्रमाणें देणें, हें बँकेचें कर्तव्यच आहे. त्यांच्या सूचनेप्रमाणें पैशाची वर्गावर्गी करणें व त्यांच्या कर्जाची व्यवस्था पहाणें, हीं कामेंहि रिझर्व्ह बँकेचीं आहेत. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांचा हा व्यवहार कोणत्या अटींवर करावयाचा, ह्याबाबत बँकेनें त्यांच्याशीं करार केलेले आहेत. मामुली बँकिंगच्या व्यवहारासाठी बँकेस स्वतंत्र मोबदला मिळत नाहीं, परंतु सरकारी पैशास बँक व्याज बिलकुल देत नाहीं. खात्यावरील बाकी ठराविक रकमेच्या खाली गेली, तर उलट सरकारकडून बँकेस कमिशन मिळतें.

(स्थापना १८७२)

७६१ रविवार पेठ, पुणे २

१००६ व १००४···भावांकरितां लिहा···

मुजुमदार टॉय वर्क्स

माना हालणारीं देशी लांकडी चित्रें येऊन पहा.

२५५।४ झेंडे वाडा, सदाशिव पेठ, पुणें शहर.

## दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि०, कराड.

स्थापना १९१७) तारीख ३०-६-४४ अखेर ( ऑडिट वर्ग 'अ'

| | |
|---|---|
| १ वसूल भांडवल रु. ८८,००० | १ हातांतील व बँकांतील शिल्लक रु. ३,४८,००० |
| २ रिझर्व व इतर फंड्स रु. ६५,००० | २ सरकारी कर्जरोखे, शेअर्स वगैरे रु. ३,७१,००० |
| ३ ठेवी ... रु. ९,७३,००० | ३ कर्जे रु. ६,२४,००० |

डिव्हिडंडचा दर ७½ %

खेळतें भांडवल रु. ११,१४,०००/- थकबाकीचें प्रमाण शें. १·४

ठेवी स्वीकारणें, कर्जे देणें, हुंड्यांची खरेदीविक्री, चेक्स, ड्राफ्ट व रेल्वे रिसीट्स वसुली, वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

म. वि. खंडकर,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## धी बुधगांव बँक लिमिटेड, बुधगांव.

स्थापना १९३१

शाखाः—माधवनगर, गुडगेरी व खंडाळी.

ठेवींवरील व्याजाचे चालू दर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| मुदत ठेव | ५ | वर्षे | द. द. | शेंकडा | ४ | टक्के |
| " | ३ | " | " | " | ३⅞ | " |
| " | २ | " | " | " | ३¾ | " |
| " | १ | " | " | " | ३ | " |
| सेव्हिंग ठेव | | | " | " | २ | " |
| करंट | | | " | " | ½ | " |

विशेष माहिती समक्ष अगर पत्रद्वारें दिली जाईल.
बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

हुकुमावरून,
R. M. Gokave,
ॲ. मॅनेजर.

फलटण दरबारकडून पुरस्कृत असलेली

## श्रीलक्ष्मी सें. को. बँक, लि. फलटण.

( स्थापना १-२-१९२६ )

| | |
|---|---|
| मागितें वसूल भांडवल ... ... रु. | ६०,००० वर |
| राखीव व इतर निधि ... ... रु. | १,०३,००० वर |
| ठेवी ... ... ... ... रु. | ११,३०,००० वर |
| खेळतें भांडवल ... ... ... रु. | १३,९९,००० वर |

- चालू, सेव्हिंग्ज व मुदत ठेवी स्वीकारण्यांत येतात.
- बँकेस जोडून घेतलेल्या सहकारी पेढ्यांना व बँकेच्या भागीदारांना सर्व प्रकारच्या तारणांवर कर्ज आणि योग्य तारणांवर ओव्हरड्राफ्ट मिळण्याची सोय करण्यांत आली आहे.
- चेक हुंड्यांची खरेदी-विक्री, सर्व प्रकारच्या बिलांची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार या बँकेंत होतात.
- वेस्टर्न इंडिया, नेपच्यून, एशियन व कॉमनवेल्थ या विमा कंपन्यांच्या हप्त्यांच्या रकमा स्वीकारण्यांत येतात.
- ही बँक फलटण दरबार, दि फलटण शुगर वर्क्स लि., व सर्व स्थानिक सार्वजनिक संस्था यांची बँकर्स आहे.

अधिक माहिती समक्ष अगर पत्रद्वारें.

श्री. ह. तळवलकर, व्यवस्थापक, श्रीलक्ष्मी सें.को. बँक लि., फलटण.

वि. शं. झिरपे, बी. ए., एलएल. बी., वकील, संचालक मंडळाध्यक्ष, श्रीलक्ष्मी सें.को.बँक,लि.,फलटण

## आघाडीचे मार्गावर

३१-१२-४३ रोजींचे आंकडे

पुऱ्या केलेल्या नव्या कामाचा आंकडा

## २ कोटी, १५ लक्ष रु.

पेक्षां ज्यास्त

( १९४२ चे कामापेक्षां ६१ % वाढ )

| | |
|---|---|
| हप्त्यांचें उत्पन्न | ५९ लक्ष रु. पेक्षां अधिक |
| एकूण मालमत्ता | ३ कोटी, २० लक्ष रु. पेक्षां अधिक |
| एकूण दिलेले क्लेम | २ कोटी, ८६ लक्ष रु. पेक्षां अधिक |

विमा उतरण्यासाठी किंवा एजन्सीसाठी

## भा र त

इन्शुअरन्स कंपनी लि० लाहोर

ह्या कंपनीचीच निवड करा.

स्थापना १८९६

कै. नानासाहेब सरपोतदार यांनीं स्थापिलेलें

# पूना गेस्ट हाऊस

लक्ष्मी रोड, पुणें २. टेलिफोन नं. ७७९

## आपल्या पुढील कांहीं प्रश्न

श्री. संपादक महाशय ‘ अर्थ ’ यांसी सा. :न. वि. वि. हिंदुस्थानाच्या आर्थिक अभिवृद्धीच्या कोडो रुपयांच्या योजना मांडण्यांत येत आहेत. प्रचंड भांडवलाच्या मोठमोठ्या कंपन्या स्थापन होत आहेत. तरी आपल्या गरीब महाराष्ट्राच्या युद्धोत्तर प्रश्नांचा विचार आपण सर्वांनीं करावयाला नको कां ?

विमा कंपन्यां, बँका आणि औद्योगिक कारखाने या सर्वांना साधारणपणें युद्धाचीं वर्षे बरीं गेलीं. गेल्या तीन-चार वर्षांत प्रतिवर्षी अधिकाधिक धंदा मिळून उच्चांक गांठला जात आहे. ज्या प्रमाणांत काम वाढलें त्या मानानें खर्चाचीं तोंडें जवळ जवळ तींच राहिल्यानें “ खर्चाचें प्रमाण ” ठीक राहिलेलें दिसतें. विमा कंपन्यांवर रक्कम गुंतविण्याबाबत कायद्याचें नियंत्रण असल्यानें त्यांचा त्याबाबतचा प्रश्न एकप्रकारें सुटल्यासारखा आहे. बँकांच्या हाताशीं भरपूर पैसा असल्यानें त्यांची सुस्थिति आहे. बहुतेक बँकांनीं नवीन शेअर भांडवल विकावयास काढलें आहे. युद्धोत्तर पैशाची चणचण होईल. त्या काळांत मजबुती राहण्याच्या दृष्टीनें चालवलेले हे प्रयत्न योग्य आहेत. भरपूर शेअर-भांडवलाच्या आधारावरील बँका कोणत्यांहि वाईट परिस्थितीशींहि यशस्वी रीतीनें टक्कर देऊं शकतील .

कारखान्यांचे प्रश्न विविध व अधिक गुंतागुंतीचे आहेत. युद्धामुळें वाढलेलें काम युद्ध-समाप्तीनंतर कमी होईल. परदेशी व परप्रांतीय स्पर्धा तीव्रतेनें जाणवूं लागेल. स्पर्धा दुहेरी असते.मालाच्या गुणांत नि किंमतींत. त्याकरितां अद्यावत् नवीन यंत्रसामुग्री मिळविण्याची कोशीस करावी लागेल. पुनर्घटनेच्या घाईंत तयार केलेलीं यंत्रें पहिल्या प्रतीचीं असतीलच असा हवाला देतां येत नाहीं. तथापि यंत्रांशिवाय चालणार नाहीं ही गोष्टहि तितकीच खरी आहे. इंग्लंड-अमेरिकेंत ५–२५ टक्क्यांहून अधिक किंमती वाढलेल्या नाहींत. उलट आपल्याकडील किंमतींतील वाढ शेकड्यांनीं झाली आहे. देशी व परदेशी तयार मालाच्या किंमतींतील तफावत या विशिष्ट घटनेमुळें अधिकच वाढण्याचा संभव दिसतो.

कच्च्या मालाच्या किंमती कमी होतील; पण मजुरी व इतर खर्च तांबडतोब उतरण्याची शक्यता नाहीं. काटकसरीची कात्री मॅनेजिंग एजंटांच्या मुशाहि-यास नि शेअरवरील डिव्हिडंडास लावावी लागेल. मला या ठिकाणीं नमूद करून ठेवणें इष्ट वाटतें कीं महाराष्ट्रीय मॅनेजिंग एजंटस, ठेवीदार व शेअर होल्डर्स यांना कांहींहि न देतां कारखान्यांना आपले संसार एक दिवसहि चालवितां येणार नाहींत. त्यांचा योगक्षेमच कंपन्यांतून मिळणा-या मुशाहि-यांतून, व्याजांतून नि डिव्हिडंडमधून चालतो, हेंच त्याचें कारण. तथापि त्यांतल्या त्यांत भागीदार व ठेवीदार ह्यांच्या पैशाचे आधारावरच मुख्यत: कंपन्या व भांडवल उभारणाऱ्या महाराष्ट्रीय मॅनेजिंग एजंटांसच ज्यास्त स्वार्थत्याग दाखवावा लागेल. एकमेकांना विश्वासांत घेऊन कार्य केल्यास आपला संसार नेटका तर होईलच; पण सुखाचा, भरभराटीचाहि होईल यांत मला संदेह वाटत नाहीं.

— संजय




डोंगरे यांचें बालामृत

दिल्यानें

मुलांचें शरीरसंवर्धन

होऊन त्यांचे स्नायू

जोमदार होतात.

मालक—के. टी. डोंगरे आणि कं.,

मुंबई ४.

“ विजय टेक्स्टाइल्स लिमिटेड ”

एरंडवणें, पुणें ४.

सर्व तऱ्हेचें कापड आमचे कारखान्यांत विणलें जातें. युद्धपरिस्थिति थोडी निवळतांच आम्हीं वैयक्तिक ग्राहकांच्या सेवेस पुन: हजर होऊं.

आमचे ग्राहकांस व हितचिंतकांस नवें वर्ष सुखदायी होवो.

★

## विमा–कायद्यांत नवीन सुधारणा

मध्यवर्ती सरकारच्या व्यापारी शाखेचे प्रमुख अधिकारी, सर महंमद अझीझुल हक यांनीं नुकतीच मुंबईस भेट दिली व त्यांच्या अध्यक्षतेखालीं विम्याबाबतच्या सल्लागार समितीची बैठक झाली, त्यावेळेस विमेदारांच्या हितवर्धनाच्या दृष्टीनें विमा कायद्यांत आणखी सुधारणा करण्यासंबंधीं विचारविनिमय झाला. त्या बाबतींत गोषवारा देऊन त्यावर चर्चा करण्याचा या लेखांत प्रयत्न केला जात आहे.

(१) निवळ आयुर्विम्याचें काम करणाऱ्या कित्येक कंपन्यांकडून सर्वसाधारण विम्याचें काम करण्याचे दृष्टीनें सरकारकडे परवानगी मागण्यांत येते अशा कंपन्यांचा आयुर्विमानिधी विमा कायद्याच्या नियमापेक्षां कमी आहे आणि सर्वसाधारण विम्याचें कार्य करण्याची परवानगी हवी असेल अशा विमा कंपन्यांनीं आपला आयुर्विमानिधि नियमाचे कक्षेंत प्रथम आणलाच पाहिजे अशी सूचना समितीस करण्यांत आली.

(२) चर्चेतील अत्यन्त वादग्रस्त असा मुद्दा म्हणजे विमा कायदा कलम ४० पोटविभाग २ यांत एजन्ट नेमणारे मध्यस्त पेशल एजन्ट व चीफ एजन्ट यांस द्यावयाच्या कमिशनवर नियंत्रण घालण्याबाबत होता. पण या मुद्द्यावर आज ४ वर्षे वादविवाद होऊन देखील त्यावर दुमतच आहे.

(३) प्रॉव्हिडंट विमा कंपन्यांना पैसा गुंतविण्याबाबत जादा सवलती देणें आणि विमा कायदा कलम ८७ साठीं समाधानकारक माहिती न आल्यास किंवा चौकशी अंतीं कंपनीची परिस्थिति असमाधानकारक असल्यास आणि ती नादार वाटल्यास बंद करण्याचा अधिकार विमा अधिकाऱ्यास देण्याबद्दल विचारविनिमय झाला.

(४) विमा कंपन्यांची सांपत्तिक परिस्थिति अजमावतांना न जमा झालेलें भांडवल हिशेबांतून वगळावें असाहि विचार झाला.

(५) विमा एजन्टास एखाद्या विमा कंपनीचे डायरेक्टर होण्याविरुद्ध किंवा डायरेक्टरचे जागीं चालू राहण्याचे विरुद्ध निर्बंध घालणेबाबत चर्चा झाली.

(६) विमा अगर प्रॉव्हिडंट कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर किंवा मॅनेजर यांस आपल्या जागेवर आपल्या भागून कोणी बसावें याबाबत हक्क न देणें आणि अशा मॅनेजरास अगर मॅनेजिंग डायरेक्टरास जो तनखा द्यावयाचा तो विम्याचे कामावर कमिशनचे रूपांत देणें किंवा नफ्याचा भाग म्हणून देण्याबाबत निर्बंध घालणें याबाबत चर्चा झाली.

यावरील विवेचन खालील स्वरूपांत मांडता येईल.

(१) पुष्कळ विमा कंपन्यांच्या चालकांची कल्पना अशी आहे कीं आपली आयुर्विमा खात्यांतील केवढीहि तूट आपण सर्वसाधारण विम्याचें काम करून भरून काढूं शकूं, परंतु जी गोष्ट आयुर्विम्याबाबत तीच गोष्ट सर्वसाधारण विम्याचे बाबतही अनुभवास येते. कोणत्याही प्रकारचें विम्याचें काम मिळवितांना शास्त्रशुद्धतेस न अनुसरतां आणि केवळ चढाओढीच्या भरीस पडून नुकसानींत काम करण्याची संवय कित्येक कंपन्यांस असते आणि अशांस सर्वसाधारण विम्याचें काम करण्यास परवानगी देणें रास्त नाहीं हें कोणीही कबूल करील, कारण त्यामुळें


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

**शेतकऱ्यांची प्रांतिक बँक**

म्हणजेच

**बॉम्बे प्राव्हिन्शियल को-ऑपरेटिव बँक, लिमिटेड**

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११

मुख्य कचेरी
सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग
९, बेक हाऊस लेन, कोट मुंबई.

**शाखा ४४**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा.

व्ही. एल. मेहता
मॅनेजिंग डायरेक्टर.

कंपनीच्या एका व्यवहारांतील तोट्यांत दुसऱ्या व्यवहारांतील तोट्याची भर पडून नुकसान द्विगुणितच होईल. अशांना पहिलें नुकसान भरून काढल्याखेरीज परवानगी न देणें रास्त ठरेल.

( २ ) या अत्यंत वादग्रस्त मुद्द्यावर जी अद्याप एकतानता होऊं शकत नाहीं त्याला मुख्य कारण देशी व विदेशी कंपन्यांच्या मध्यस्ती चीफ एजन्टाचे स्वार्थ. याबाबत सत्वर नियंत्रण येणें अत्यंत जरूरीचें आहे आणि हें नियंत्रण जर आलें नाहीं तर विमा कायदा सुधारणारे श्रेष्ठी विमेदारांच्या हिताचे दृष्टीनें कितीही जरी धडपडले तरी निष्फळ ठरून विमा कंपन्यांचे आयुर्विमा निधि तुटपुंजे राहून, विमापत्रांत ते अपुरे पडून, विमा कंपन्यांकडून विमेदारांचें नुकसान होण्याचा संभव आहे. तेव्हां हें नियंत्रण तावडतोब बसवावें अशी आग्रहाची सूचना आहे.

( ३ ) प्रॉव्हिडंट विमा कंपन्यांना सवलती देणें किंवा त्या टिकूं देणें हें विमेदारांच्या दृष्टीनें विघातकच होणार आहे. यापेक्षां सर्व प्रॉव्हिडन्ट कंपन्यांचें काम भक्कम आयुर्विमा कंपन्यांचे कामांत मिळवून प्रॉव्हिडन्ट कंपन्या बंद केल्या व आयुर्विमा कंपन्यांवरील कामाचे निर्बंध काढून टाकले तर त्यानें विमेदारांचें कल्याण होईल. नाहींतर ह्या प्रॉव्हिडन्ट कंपन्या म्हणजे गरीब विमेदारांचा काळ आणि स्वार्थी चालकांची तरतूद म्हणून राहणार आहेत.

( ४ ) सूचना रास्त आहे.

( ५ ) विमा एजन्टास विमा कंपनीचे डायरेक्टर असूं देणें कोणत्याही प्रसंगीं वाजवी ठरणार नाहीं आणि हा निर्बंध सत्वर लादला जावा.

( ६ ) विमा कंपनी ही जनहितकारक संस्था आहे. तिच्या मुख्य संचालकाची जागा म्हणजे पिढीजाद चालणारी जहागिरी, सरदारी किंवा गादी नव्हे. ती जागा अत्यन्त जबाबदार किंवा विमाशास्त्रपारंगत अशा व्यक्तीचे हातीं देणें अवश्य असल्यामुळें कोणत्याही चालकास आपल्या वशिल्याचा माणूस आपल्या जागीं गुळाचा गणपति म्हणून बसविण्याचा अधिकार देणें अयोग्य ठरेल म्हणून हा निर्बंध आवश्यक आहे.

आतां राहता राहिला प्रश्न चालकांच्या वेतनाचा. कोणत्याही संस्थेच्या बाल्यावस्थेंत चालकास निव्वळ पगारी ठेवण्यापेक्षां नुसत्या कमिशनवर किंवा पगारी व कमिशनवर ठेवणें संस्थेच्या दृष्टीनें हितकारक ठरेल. याचा परिणाम चालकाला संस्थेच्या हितार्थ अधिकाधिक धडपडण्यास उत्तेजन मिळण्याचे दृष्टीनें होईल, परंतु चालकांचा तनखा एका किमान मासिक मर्यादेपर्यंत पोहोंचल्यानंतर त्याला कंपनीच्या एकूण कामावर कमिशन मिळणें योग्य ठरणार नाहीं. त्यापुढें चालक निव्वळ पगारी राहून त्याच्या पगारांत होणारी वाढ कंपनीच्या एकूण चालू कामावर आणि किमान वार्षिक मिळणाऱ्या कामावर अवलंबून ठेवल्यास कंपनीचें हित, विमेदारांचें हित आणि चालकांचें हितही साधलें जाईल. तेव्हां असा सरसकट निर्बंध घालणें योग्य ठरणार नाहीं. तरी तो वरील सूचना लक्षांत घेऊन घालण्यांत यावा.


## अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि. सांगली

( स्थापना : १९३५ )

**मांडवल**

| | |
|---|---|
| अधिकृत ... ... | रु. १,००,००० |
| वसूल झालेलें ... ... | रु. ८३,३४० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. १५,९०० |
| एकूण खेळतें मांडवल ... | रु. ८,२९,००० |

**डायरेक्टर्स**

श्री. स. ग. फडके, चेअरमन

श्री. ग. कों. गोडबोले, श्री. ज. वि. करमरकर

,, ज. ग. गोडबोले, श्री. बा. गो. शिराळकर

,, वा. वि. वाटवे, ,, म. ह. गोडबोले

डॉ. ल. बा. फडणीस, ,, बा. ह. गोसावी

बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात.

आर. सी. खाडिलकर,
मॅनेजर.

सर्वांचे विश्वासांतील व एकमेव आदरणीय

## दि कमार्शिअल बॅन्क लिमिटेड, कोल्हापूर शहर.

**मांडवल**

| | |
|---|---|
| अधिकृत व खपडेलें | रुपये १,००,००० |
| वसूल झालेलें | ,, ५०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ,, १२,२५,००० |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँकिंगसंबंधीं व्यवहाराची इतर माहिती ऑफिसमध्यें देऊं.

गणपतराव लक्ष्मणराव साळोखे,
मॅनेजिंग डायरेक्टर

## —प्रत्येक कुटुंबांत—

आमचीं "होमिओ-स्पेसिफिक्स" संग्रहीं असलीं पाहिजेत, हें लोकांना पटलें आहे. तीं हमखास गुणकारी, घेण्यास सोयिस्कर व किंमतींत माफक असतात.

★ फीव्हर एस सर्व तऱ्हेच्या तापांवर अप्रतिम गुणकारी. किं. रु. २.

★ होमिओलॅक्स—बिनत्रासानें शौचशुद्धि करणारें. बा. किं. रु. १. पाकीट ॥.

★ बालमित्र—लहान मुलांना उद्भवणाऱ्या सर्व विकारांवर खात्रीचा उपाय. किं.रु.२. ट. खर्च निराळा.

संपूर्ण माहितीकरितां लिहा.

—सुधा एजन्सी—

३।८ खांडके बिल्डिंग, दादर. मुंबई १४.

## पैसा व ज्ञान देणारीं पुस्तकें !

श्रीमंत कसें व्हावें ? संपत्तीचे सुंदर मार्ग दाखवून हजारों रु. मिळवून देतें. वाचून लक्षाधीश व्हाल ! किं. १॥ रु. काम आणि कामिनी. काम शास्त्रावरील अपूर्व ग्रंथ ! किं. १॥ रु. मृत्युलोकचा प्रवास ! मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत प्रवासाचें कथानक ! किं. १ रु. लिहा. बिपट आणि मंडळी, कराड जि. सातारा.

## कच्च्या मालाचा पुरवठा करणारे प्रमुख देश

(उत्पादनशक्तीच्या अनुक्रमानें, १९४१)

साखर (उंसाची)—हिंदुस्थान, क्युबा, अमेरिका, जावा, ब्राझील, फोर्मोसा, ऑस्ट्रेलिया.

साखर (बिटाची)—रशिया, जर्मनी, ऑस्ट्रिया, अमेरिका, इटली, फ्रान्स, ग्रेट ब्रिटन.

चहा—चीन, हिंदुस्थान, सिलोन, नेदरलंड, ई. इंडीज, जपान, रशिया.

कॉफी—ब्राझील, कोलंबिया, नेदरलंड, ई. इंडीज, साल्वेडॉर, व्हेनेझुएला, केनिया.

तंबाखू—चीन, अमेरिका, हिंदुस्थान, रशिया, ब्राझील, तुर्कस्थान, बल्गेरिया, ग्रीस.

बटाटे—जर्मनी, रशिया, पोलंड, फ्रान्स, अमेरिका, ग्रेट ब्रिटन, आयर्लंड, स्पेन, हंगेरी.

छपाईचा कागद—कॅनडा, अमेरिका, ग्रेट ब्रिटन, फिनलंड, जपान, जर्मनी, न्यू फौंडलंड.

हिरे—बेल्जिअन कॉंगो, गोल्ड कोस्ट, अँगोला, सिएरा लिओन, द. आफ्रिका, ब्राझील.

सोनें—द. आफ्रिका, अमेरिका, कॅनडा, रशिया, ऑस्ट्रेलिया, जपान, गोल्ड कोस्ट, मेक्सिको, द. ऱ्होडेशिया.

चांदी—मेक्सिको, अमेरिका, कॅनडा, पेरू, ऑस्ट्रेलिया, जपान, बोलिव्हिया, हिंदुस्थान, ब्रह्मदेश.

तांबें—अमेरिका, उ. ऱ्होडेशिया, बे. कॉंगो, चिली, कॅनडा, रशिया, जपान.

पेट्रोल—अमेरिका, रशिया, व्हेनेझुएला, इराण, इराक, नेदरलंड, ई. इंडीज, मॅक्सिको, रुमेनिया.

## सांडू ब्रदर्संचा आर्यौषधि कारखाना

या कारखान्याची माहिती नाहीं असा मराठी जाणणारा इसम महाराष्ट्रांत क्वचितच असेल. त्याची स्थापना चेंबूर (मुंबईनाजिक) सन १८९९ सालीं झाली. तद्नंतर गेल्या ४४ वर्षांत हळूहळू त्याची सर्वांगिण वाढ झाली असून तिला प्रगमनशील स्वरूप होण्याचे दृष्टीनें कारखान्याचें १९४० मध्यें लिमिटेड कंपनींत रूपांतर झालें.

कारखान्यामध्यें तयार होणारीं औषधें आयुर्वेदीय शास्त्रपद्धतीनें होतात व तीं हिंदुस्थानांतील सर्व वर्गाच्या प्रकृतीस मानवतील असेंच धोरण कंपनीचें आहे. या कारखान्याचे ५०० पेक्षां जास्त विक्रेते असून अलिकडे माल मिळण्यास सुलभ व्हावें म्हणून कंपनीनें स्वतःचीं ठिकठिकाणीं केंद्रें व शाखा उघडल्या आहेत.

सांडू ब्रदर्सचीं ब्राह्मीतेल-बाळंतकाढा-हार्टोना-टोमॅटो कंपाउंड-प्रेगयुटेरो वगैरे सुप्रसिद्धच आहेत. अशींच औषधें प्रत्येक वर्षी निघत असतात. सध्यां तयार होत असलेल्या औषधांची संख्या ७०० हून जास्त वाढली आहे. चेंबूर येथें कारखान्याच्या सर्वांगीण सुधारणा व्हाव्यात असें चालकांचें धोरण असून त्याप्रमाणें सुधारणा होत आहेत.

मुंबईहून चेंबूर १२-१३ मैलांवर असून कुर्ला-सायन या स्टेशनवरून अनुक्रमें रेल्वे-बसनें जाण्याची उत्तम व्यवस्था आहे. आगाऊ पत्रव्यवहार केल्यावर सर्व व्यवस्था आस्थापूर्वक होत असते. टेलिफोनचीही व्यवस्था आहे. कारखाना दाखविण्यास चालक नेहमीं तत्पर असतात. लोकांनीं कारखान्यास अवश्य भेट द्यावी.

तेजस्वी आरोग्यानें दीपावलि मंगलप्रद होवो.



आयुर्वेद रसशाळा पुणें लि० पुणें ४

कायामृत सिद्धकल्प

◆ हा, हजारों निराश झालेल्या रोग्यांना रोगमुक्त केल्यामुळें, त्यांच्या आदरास व प्रशंसेस पात्र झालेला.

◆ शरिराची भयंकर झीज भरून काढून सर्व प्रकारचे वात, अर्धांग, एकांग, दमा, श्वास व खोकला इत्यादि विकार नष्ट करणारा.

◆ मंदाग्नि, अपचन, शीतज्वर, अतिसार, पोटदुखी, संधिवात वगैरे अनेक रोगांवर हमखास गुण देणारा असून किंमतींत माफक आहे.

दहा तोळ्यांस ३ रुपये. ट. ख. निराळा.

पंडित आठल्ये वैद्य,

बालाजी ड्रॉट्स, खामगांव (वऱ्हाड), G. I. P. Ry.

महाराष्ट्रांत लेखी गॅरंटी देणारे

पहिले व फक्त १ च

गोल्ड मेडॅलिस्ट व मराठी वळणाचे स्पेशॅलिस्ट

पेन्टर वेडेकर, ए. जी.,

बुधवार चौक, पुणें २ (सिटी)

बाहेरगांवचीं कामें रेल्वे, मोटार अगर पोस्टानें पाठवूं.

पुण्यांतील

आदर्श निवासस्थान व भोजनालय

छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस

बुधवार चौक, पुणें २.

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.

भट कंपनी शाखा—बुधवार पेठ, पुणें २.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.

सदरहु बँकेनें आपल्या कामास सुरवात केल्यास या महिनाअखेर ६ वर्षे पूर्ण होतील. या अवधींत बँकेनें गाजावाजा न करतां केलेलें कार्य व तिची झालेली प्रगति या गोष्टी अभिनंदनीय अशाच आहेत. बँकेचें आज मितीस खेळतें भांडवल २५ लाख रुपयांचेवर असून, शेअर्स रूपानें जमा झालेलें भांडवल रु. १,३०,००० चे वर आहे. त्याचप्रमाणें बँकेनें आपलें कार्यक्षेत्र पुणें शहरापुरतेंच मर्यादित असें न ठेवतां जरूर असेल अशा ठिकाणीं इतरत्र शाखा उघडण्याचें धोरण जाहीर केलें आहे. १९४४ सालाचे प्रारंभीं बँकेनें लोणावळा येथें एक शाखा उघडली व दुसरी नुकतीच म्हणजे विजयादशमीचे सुमुहूर्तावर बेलापूर रोड येथें नगर येथील श्रीमान् शेट मोतीलाल कुंदनमल फिरोदीया, बी. ए. यांचे हस्तें उघडण्यांत आली आहे.

वर दिग्दर्शित केल्याप्रमाणें व्यापारधंद्याचें क्षेत्र ज्या ठिकाणीं मोठें आहे व ज्या ठिकाणीं बँकेची जरूरी आहे अशाच ठिकाणीं बँकेनें आपल्या शाखा उघडण्याचें धोरण ठेविलें आहे. अशा शाखा उघडत असतांना तेथीलच प्रतिष्ठित व सुप्रसिद्ध असे नागरिक अगर व्यापारी यांचें एक सल्लागार मंडळ स्थापन करण्यांत येऊन त्यांचे देखरेखीखालीं त्या त्या शाखेची व्यवस्था सोपविण्याचें बँकेचें धोरण आहे. याप्रमाणें बँकेच्या निरनिराळ्या शाखांचे सल्लागार मंडळांत रा. ब. शेंबेकर, रा. ब. जाचक, दि. ब. जगताप, सेटना वकील, रावसाहेब पन्हाळे, अॅडव्होकेट मावन, आमदार गिरमे, श्री. बोरावके वगैरे सुप्रसिद्ध अशा मंडळींचीं नांवें आढळतात. बँकेनें आपले नांवास साजेल असेंच धोरण उद्योगधंद्याचे व व्यापार वाढीचे बाबतींत स्वीकारलें आहे.

बँकेनें गेल्या महिन्यांत गव्हर्नमेंट ऑफ इंडिआकडून दर्शनी किंमत रु. ५,९८,०५०च्या ऑर्डिनरी शेअर्सची विक्री करावयाची परवानगी मिळविली असून त्यांची विक्री झपाट्यानें चालू आहे. चेअरमन श्री. के. व्ही. केळकर वकील यांनीं १ लाख रुपयाच्या शेअर्सना एका महिन्यांतच मागणी आल्याचें जाहीर केलें आहे. बँकेस सुरवातीपासून प्रतिष्ठित व्यापारी मंडळी डायरेक्टर लाभली असून विशेष म्हणजे बोर्डावर एक सुविद्य महिला सौ. इंदुताई फडके, बी. ए., बी. टी. या आहेत. बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. आर. बी. साळवेकर, बी. ए., एलएल. बी. व श्री. एन. एन. क्षीरसागर असे असून आज दिसत असलेला विस्तार हा त्यांच्या कर्तबगारीचें दृश्य स्वरूप आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

---

### रिपोर्ट मिळाला नाहीं, तरी डिव्हिडंडला विलंब नको

इंडियन आयर्न अँड स्टील कंपनीची मुख्य कचेरी इंग्लंडमध्यें आहे. कंपनीच्या डायरेक्टरांचा अहवाल व हिशेब इंग्लंड व हिंदुस्थान येथें एकदमच प्रसिद्ध केले जातात. परंतु टपाल वेळेवर येत-जात नसल्याकारणानें ह्या प्रसिद्धीकरणास विलंब लागतो. त्यामुळें भागीदारांस डिव्हिडंड मिळण्यास वेळ लागूं नये, ह्यासाठीं डायरेक्टरांनीं अॅड-इंटेरिम डिव्हिडंड मंजूर केलें आहे. हेंच ३१ मार्च अखेरचें डिव्हिडंड समजलें जाईल.

## मॅनेजिंग एजंटांचा नफा

औद्योगिक लिमिटेड कंपन्यांचा कारभार मॅनेजिंग एजंटांकडे असतो व हे मॅनेजिंग एजंट कराराप्रमाणेंच परंतु भरमसाट पैसा मिळवितात, अशी त्यांच्याविरुद्ध साधारण ओरड असते. योग्य अलावन्स व नफ्याचा वाजवी वाटा, एवढ्यावर मॅनेजिंग एजंट संतुष्ट राहिले तर भागीदारांस तक्रार करण्याचें कांहींच प्रयोजन उरणार नाहीं. परंतु कांहीं मॅनेजिंग एजन्सीच्या करारांतील अटी मॅनेजिंग एजंटांना अवास्तव अनुकूल असतात. उदाहरणार्थ, कांहीं मॅनेजिंग एजंट दरमहा १,००० ते १,५०० रुपये घेऊन शिवाय घसारा, इन्कम टॅक्स, सुपर टॅक्स, एक्सेस प्रॉफिट टॅक्स वगैरे न काढतां रहाणाऱ्या निव्वळ नफ्याचा १०% भाग घेतात. नफ्याच्या १०% किंवा वसूल भांडवलाच्या १½% रकमेइतकी रक्कम घेणारेहि कांहीं मॅनेजिंग एजंट क्वचित् आढळतात. स्टोर्स, कच्चा माल, कपास, सूत, इत्यादींच्या खरेदीविक्रीवर कमिशन घेणारेहि मॅनेजिंग एजंट आहेत. कसोशीनें खरेदी करण्याचा काटकसरीचा दुसरा मार्ग असणें शक्य नाहीं काय? कापडाच्या किंवा सुताच्या गाठीवर कांहीं मॅनेजिंग एजंट १० ते १२% कमिशन आकारतात. इतक्या चात्या किंवा अमुक माग वाढविले म्हणजे ऑफिस अलावन्समध्यें इतकी वाढ व्हावयाची असा कांहीं मॅनेजिंग एजंटांचा करार असतो. बँका व विमा कंपन्या ह्यांचा कारभार पहाण्यास मॅनेजिंग एजंटाची नेमणूक करतां येत नाहीं, परंतु मॅनेजिंग डायरेक्टर किंवा मॅनेजर ह्यांचें वेतन नफ्यावर किंवा मिळणाऱ्या हप्त्यांच्या उत्पन्नावर अवलंबून ठेवलेलें कित्येक कंपन्यांत आढळतें. ही पद्धत ह्यापुढें चालू राहणार नाहीं, अशी दुरुस्ती कायद्यांत केली जावयाची आहे. कंपनी काढणाऱ्या मॅनेजिंग एजंटास त्याच्या पत्करलेल्या जोखिमच्या मानानें व कर्तबगारीच्या प्रमाणांत नफ्यामध्यें भागीदारी मिळणें रास्त असलें, तरी बहुंशीं भागीदारांच्या व ठेवीदारांच्या पैशावर व सर्वांच्या सक्रिय सहानुभूतीवर कंपन्या यशस्वी करणाऱ्या महाराष्ट्रीय मॅनेजिंग एजंटांनीं जरा संयम दाखविणें उचित आहे. मध्यम वर्गातील लोकांच्या बचतीच्या पैशाच्या आसनावर श्रीमंत होऊन त्याचा ढोल मिरविणाऱ्या मॅनेजिंग एजंटांचें उदाहरण महाराष्ट्रीय आर्थिक व औद्योगिक प्रगतीचा जिव्हाळा वाटणाऱ्या स्वार्थत्यागी सामान्य नागरिकांचे डोळ्यांत सलण्याचा संभव असतो, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. मॅनेजिंग एजन्सीच्या नफ्याचा विनियोग मॅनेजिंग एजंट कसा करतात इकडे लोकांचें लक्ष असतें, हें विसरून चालणार नाहीं.

---

### रशियाशीं अमेरिकेचा व्यापार

अमेरिकेच्या प्रमुख व्यापारी चेंबरचे अध्यक्ष, मि. जॉनसन, ह्यांनीं रशियास भेट देऊन तेथें अमेरिकन व्यापारास किती वाव आहे, ह्याचें निरीक्षण केलें. रशिया पूर्वस्थितीस येण्यासाठीं त्याला १० ते ३० वर्षे लांब मुदतीच्या कर्जाची आवश्यकता आहे असें त्यांनीं एका मुलाखतींत सांगितलें. सर्व खरेदी रशियन सरकारच करील, खासगी व्यापार होणार नाहीं; तथापि भांडवलशाही व कम्यूनिझम ह्यांचा परस्पर व्यापार वाढण्यास अडचण पडणार नाहीं, असें ते म्हणाले.

## दि मिरज स्टेट बँक लि.

मिरज

(स्थापना १९१९)

अधिकृत भांडवल ... ... रु. १,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें ... रु. १,००,०००
प्रत्येक शेअरचे रु. १०० प्रमाणें
वसूल झालेलें ... रु. १०,०००
रिझर्व्ह व इतर फंड ... रु. १,००,०००चे वर
एकूण खेळतें भांडवल ... रु. ४१,००,०००चे वर

डायरेक्टर्स

१ रावसा. वि. पां. वेडेकर, बी. एस्सी., बी. ई. (चेअरमन)
२ डॉ. कृ. गो. गोसावी, एल्. सी. पी. एस्.
३ रावसा. वि. स. आपटे, बी. ए., एलएल्. बी.
४ श्री. केशवदास सीतारामदास शेटजी
५ श्री. रामचंद्र चिंतामण आपटे

शाखा

लक्ष्मेश्वर (जि. धारवाड), मोडनिंब व कुर्डूवाडी (जि. सोलापूर)

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

के. डी. शिराळकर
मॅनेजर.

## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड.

(स्थापना १९१८)



अधिकृत व वसूल झालेलें भांडवल रु. २,००,०००
रिझर्व्ह व इतर फंड रु. १,३२,०००
ठेवी रु. ३८,००,०००
इन्व्हेस्टमेंट्स रु. ३४,००,०००
खेळतें भांडवल रु. ४२,००,०००

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

सब-ऑफिस
दादर.

हेड-ऑफिस
सारस्वत बँक बिल्डिंग.
मुंबई ४.

## दि सांगली स्टेट सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

स्थापना : १९१७ रु.

अधिकृत भांडवल : : २,००,०००
भरलेलें भांडवल : : ६८,२२०
एकूण फंड्स : : ९२,००० वर
खेळतें भांडवल : : ७,००,००० वर

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. सोन्याचे तारणावर सभासदांना कर्ज दिलें जातें. चेक-हुंड्यांची खरेदी-विक्री, रेल्वे रिसीटस यांची वसुली वगैरे सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

— अधिक माहितीकरितां समक्ष भेटा अगर लिहा —

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर

## गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.

A 9

क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा अनुभविक उपाय म्हणून 'एनाईन' वापरतात.

अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २

गिरगांव
मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक,
पुणें.

## इन्कम टॅक्सबाबत मुंबई हायकोर्टाचे दोन निवाडे

### भागीदारांच्या भागीवरील इन्कम टॅक्स

शापुरजी पालनजी मिस्त्री हे मेसर्स शापुरजी पालनजी आणि कं. ह्या कंत्राटदार फर्मचे एक भागीदार होते. त्यांचा हिस्सा १० आणे ८ पै होता व त्यांचे बंधु फिरोजशा ह्यांचा हिस्सा ५ आणे ४ पै होता. १९३७ सालीं शापुरजींनीं आपल्या हिश्श्यापैकी ४ आणे आपला मुलगा कैखुश्रु ह्यास देऊन त्यास भागीदारींत घेतलें. त्यांचा स्वतःचा हिस्सा अर्थातच ६ आणे ८ पै उरला. त्यांची भागीदारी नोंदलेली होती व तिघेजण भागीदार असल्याचें सर्टिफिकेट देण्यांत आलेलें होतें. कैखुश्रु हा आपल्या वडिलांचा केवळ एक मामुली प्रतिनिधी होता. त्याच्या हिश्श्यावर खरी मालकी शापुरजींचीच होती, असें इन्कम टॅक्स अधिकाऱ्याचें मत पडलें व त्यानें शापुरजीवर व त्यांच्या मुलाच्या उत्पन्नावरहि कर बसविला. मुलाचें उत्पन्न हें शापुरजींचें उत्पन्न ठरविण्यांत आलें. ह्यावर अखेर मुंबई हायकोर्टांत अपील करण्यांत आलें. नोंदलेल्या भागीदारीच्या करारपत्राचे मागें जाऊन, एका भागीदाराचें उत्पन्न हें वास्तविक दुसऱ्या भागीदाराचेंच उत्पन्न आहे, असें ठरविण्याचा अधिकार इन्कम टॅक्स अधिकाऱ्याला आहे किंवा नाहीं, हा महत्त्वाचा प्रश्न येथें उपस्थित झाला.

"केवळ एखादी फर्म नोंदलेली आहे म्हणून तिच्या भागीदारांच्या वाटणीसंबंधीं खोलांत जाऊन चौकशी करण्याचा अधिकार इन्कम टॅक्स अधिकाऱ्यास उरत नाहीं, हें सयुक्तिक नाहीं. चौकशी करून भागीदारांच्या व्यक्तिगत खऱ्या उत्पन्नावर कर आकारण्याचा अधिकार इन्कम टॅक्स अधिकाऱ्यास आहे. शापुरजीच्या उत्पन्नांत कैखुश्रूचें उत्पन्न धरलें ही गोष्ट इन्कम टॅक्स अधिकाऱ्यानें योग्यच केली" असा हायकोर्टानें निवाडा केला.

---

### ट्रस्ट मिळकतीचें उत्पन्न

रामजी केशवजीचा मुलगा, वसनजी, ह्यानें १९३६ सालीं मालमत्तेच्या वाटणीसाठी मुंबई हायकोर्टांत रामजी केशवजी व कुटुंबाचे इतर घटक, ह्यांवर दावा लावला. त्यांत तडजोड होऊन जो हुकूमनामा झाला, त्या अन्वयें रामजीनें आपल्या पत्नीच्या हितासाठी एक ट्रस्ट डीड केलें. ट्रस्ट मिळकतीचें उत्पन्न हें रामजी केशवजीचेंच उत्पन्न आहे असें इन्कम टॅक्स अधिकाऱ्यानें ठरविलें. रामजीनें केलेल्या ट्रस्टमध्यें, उत्पन्नावर ट्रस्ट करणाराचा पुनः अधिकार असण्याची योजना असल्याकारणानें, ट्रस्ट डीडअन्वयें उत्पन्न पूर्णतः दुसऱ्याचे ताब्यांत जात नाहीं, ह्या मुद्यावर रामजीवर इन्कम टॅक्स बसविण्यांत आला. मुंबई हायकोर्टाकडे हें प्रकरण गेलें. कांहीं कारण घडलें तरच ट्रस्ट करणारास पुनः अधिकार प्राप्त होणार, एरव्हीं नाहीं; ह्यामुळें ट्रस्टची मिळकत रामजीवर कर बसविण्याचे दृष्टीनें रामजीकडे वर्ग होत नाहीं, असें हायकोर्टाचें म्हणणें पडलें. रामजीनें आपल्या पत्नीच्या नांवें विश्वस्तपत्र केलें व ती जिवंत असेपर्यंत रामजीला कांहींच अधिकार प्राप्त होत नव्हता. तिच्या आयुष्याच्या मुदतींत त्याला ट्रस्टकडून उत्पन्न मिळण्याचा प्रश्नच उपस्थित होत नसल्याकारणानें पत्नीस मिळावयाचें उत्पन्न रामजीच्या प्राप्तींत दाखल करणें योग्य नाहीं, असा हायकोर्टानें निवाडा केला.


## सांडू ब्रदर्स यांचीं औषधें वापरा

**सांडू ब्रदर्स**

म्हणजेच ओरिजिनल

**ब्राम्ही तेल**

अनुभवसिद्ध गुणधर्म

★ मेंदू शांत राहून झोप चांगली लागते.

★ ...

महत्वाची सूचना

ओरिजिनल ब्राम्ही तेलाचे एकटेच कारखानदार

**द. कृ. सांडू ब्रदर्स**

चेंबूर लिमिटेड

मॅन्युफॅक्चरिंग केमिस्ट आणि ड्रगिस्ट

चेंबूर – मुंबई

१. पुणें चीफ एजंट– श्रीदत्त एजन्सी – रविवार पेठ, पुणें.

२. सातारा जिल्हा चीफ एजंट–जोशी आणि मंडळी तांबुळआळी, भवानी पेठ–सातारा.

३. सांगली स्टॉकिस्ट—कुळकर्णी बंधु.

४. हुबळी शाखा—कोप्पीकर रोड–हुबळी.

५. कोल्हापूर प्रमुख स्टॉकिस्ट–
मे. भागवत आणि कंपनी, कांच लाईन केबिन मार्केट.

★ आमचे आश्रयदात्यांस चालू दिवाळी आनंदाची जावो ★
चालू परिस्थितींतही मुंबईंत राहाण्यास सर्व बाजूंनीं सुखसोईचें असें एकच ठिकाण.
— वि. वा. गोखले यांचें —
न्यू श्रीकृष्ण बोर्डिंग हाऊस
टे. नं. ६१२४६
कोहिनूर सिनेमासमोर, दादर (B. B. C. I. Ry.)

दिवाळींत
'वेस्टर्न इंडिया'
चें स्मरण ठेवा.

वेस्टर्न इंडियाची पॉलिसी हा संसारी जनांचा हितकर्ता मित्र आहे. या मित्रास दिवाळीच्या आनंदांत विसरूं नका. स्मरणपूर्वक त्याचें स्वागत या प्रसंगीं आपण केल्यास आपल्या यापुढील अनेक दिवाळ्या मोठ्या सुखासमाधानांत जातील. या संस्थेचें एजन्सी कामहि अत्यंत लाभदायक असल्यानें कंपनीचे अनेक एजंट आज सुखाचा संसार करीत आहेत.

*विशेष माहितीसाठीं पत्रव्यवहार कराः—*
मॅनेजरः—वेस्टर्न इंडिया आयुर्विमा कंपनी लि.
सातारा शहर.
—: पुणें शाखा :—
१७९ बुधवार, लक्ष्मी रस्ता, पुणें २.

"मागोरा"चा अभिनव व आश्चर्यकारक शोध
ढेकणांच्या उदबत्त्या
[A. B. C.]
BUG-COILS (A. B. C.)
प्रत्येक उदबत्ती रात्रभर जळते व तोंपर्यंत ढेकूण आपलें ठिकाण सोडून बाहेर येत नाहींत.
विशिष्ट धुरांमुळें हा चमत्कार होतो.
बॉक्समध्यें बारा तांबड्या उदबत्त्या तांबड्या पॅकिंगमध्यें
बॉक्स किं. रु. १-८-०
—: लायसॉफ :—
डोक्यांतील उवा एक तासांत मारण्याचा शोध—दोन वेळ उपयोग
—बाटली किंमत १ रुपया. ट. ख. नि.—
दि मागोरा केमिकल कंपनी, लि.
हिराबाग, पुणें २

दि व्हल्कन इन्शुअरन्स कंपनी लि. मुंबई.
( स्थापना : १९१९ )
आग, मोटार, अपघात, मरीन इत्यादींचे विमे स्वीकारले जातात.
——: चेअरमन :——
सर चिमणलाल सेटलवाड, *के. सी. आय. ई.*
*: पुणें शाखा :* *: हेड ऑफिस :*
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड. : : ७३, चर्चगेट स्टेशनसमोर, फोर्ट, मुंबई

## रशियांत काडीमोड महाग व अवघड करण्यांत आला

### जननसंख्या वाढविण्याचे प्रयत्न

रशियांत जननसंख्या वाढविण्याचे प्रयत्न चालू आहेत. शहरी लोकांतील जननसंख्या वाढविण्याकडे विशेष लक्ष आहे. निपुत्रिक शहरी माणसास आपल्या उत्पन्नाच्या ६% इतकी रकम सरकारी कर म्हणून द्यावी लागते. १९३६ पर्यंत, रशियांत काडीमोड ही बाब अत्यंत स्वस्त व सोपी होती. ती आतां महाग व अवघड करून ठेवण्यांत आली आहे. दोन-चार रुबल्समध्यें पूर्वी काडीमोड मिळत असे; आतां प्राथमिक कोर्टाच्या कामासच ५० रुबल्स खर्च येतो. आघाडीवर गेलेल्या सैनिकाच्या पत्नीस ८ जुलै, १९४४ पूर्वी काडीमोड मिळवितां येत असे; आतां नव्या कायद्याप्रमाणें पती व पत्नी ह्या दोघांसहि कोर्टांत उपस्थित व्हावें लागतें. खालच्या कोर्टाचें काम दोन्ही पक्षांमध्यें तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न करणें, हें असतें. तें अयशस्वी झालें तर घटस्फोटास पुरेसें कारण घडलेलें आहे किंवा नाहीं, ह्याची कोर्ट चौकशी करतें आणि निवाड्यासाठी प्रकरण वरच्या कोर्टाकडे पाठवितें. अशीं एकावर एक चार अपील कोर्टें आहेत, त्या सर्वांतून बाहेर पडण्यास ५०० ते २,००० रुबल्स खर्च येतो. वकिलाची फी वेगळीच. कोर्टांतील काम ऐकण्याची सर्वांस मुभा असते, त्या कारणानें कुप्रसिद्धीची भीति हीहि बाब कांहीं काडमोडवाल्यांस थोडी जाचक वाटते. काडीमोड "योग्य" कारण घडलें तर मिळूं शकतो, परंतु ह्यासंबंधांतील नवा कायदा "योग्य" शब्दाचा अर्थ स्पष्ट करून सांगत नाहीं. युद्धोत्तर पुनर्घटनेची रशियाची ही पूर्व-तयारी आहे, असें सांगण्यांत येतें.

---

### इंग्लंडमध्यें वर्णद्वेषाचें प्रदर्शन

लंडनच्या, बॉंब-धोक्याचे क्षेत्रांतील उपनगरांत राहणाऱ्या एका धंदेवाइकानें आपल्या पत्नीस व तीन वर्षांच्या मुलास लंडनबाहेर खेडेगांवीं पाठविण्याची खटपट करून व्यवस्था केली व एका मध्यमवर्गीय इंग्रज स्त्रीच्या घरीं भाड्यानें जागा मिळविली. त्या स्त्रीनें ह्या कुटुंबाचें चांगलें स्वागत केलें. पुढें संभाषणांत तिला कळून आलें, कीं हें निर्वासित कुटुंब ज्यू रक्ताचें आहे व जर्मनींतून सुटका होऊन तें आलेलें आहे. ह्या गोष्टीची माहिती मिळतांच तिनें त्या कुटुंबास, डोळ्यांस पाणी आणून सांगितलें कीं मी माझ्या घरीं तुम्हांस राहूं देऊं शकत नाहीं. उडत्या बॉंबच्या धोक्याचे ठिकाणीं धाकट्या मुलास परत पुनः जावें लागलें तरी त्या आई-लेकानें तात्काळ घर खाली केलें पाहिजे असा त्याचा अर्थ होता. मुलाची आई ही सुसंस्कृत व हळव्या मनाची बाई असल्याकारणानें ह्या प्रकरणाचा तिच्या मनावर काय परिणाम झाला असेल ह्याची कल्पना केलेली बरी. घरमालकीण ही शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या दुराग्रहावरून त्या आई-लेकरास लंडनमध्यें पुनः पाठवीत होती; तिच्या स्वतःचा नाइलाज झाला, असा तिनें देखावा केला. ही गोष्ट तर जास्तच वाईट आहे. वरील माहिती देणारें एक पत्र "न्यु स्टेट्समन अँड नेशन" मध्यें प्रसिद्ध झालें आहे.

---

"Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94-A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

दि बँक ऑफ महाराष्ट्र
लि. पुणें
विक्रीस काढलेलें नवीन भाण्डवल
रु. १०,००,०००
(प्रत्येकीं रु. ५० च्या २०,००० भागांत विभागलेलें)

वरील भाग ता. ४ ऑक्टोबर १९४४ रोजीं बँकेच्या पटावर असलेल्या भागीदारांना त्यांच्या प्रत्येकीं जुन्या भागाला एक नवीन भाग रु. ५ वाढीनें देऊं केले आहेत. अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख १५ डिसेंबर १९४४ ही आहे. पहिल्या भागीदारांनीं घेऊन शिल्लक राहिलेले भाग इतरांस तेवढ्याच वाढीनें (रु. ५) देण्यांत येतील.

: संचालक मंडळ :

श्री. धों. कृ. साठे, अध्यक्ष.

श्री. वा. पुं. बर्वे — प्रो. वा. गो. काळे
श्री. न. ब. पवार — श्री. र. चिं. सोहोनी
श्री. चिं. वि. रानडे — श्री. श्री. बो. मराठे
श्री. बा. रा. जोशी — श्री. म. वि. गोखले
श्री. फ. शां. पदमजी — श्री. वि. ह. देशमुख

सी. व्ही. जोग
मॅनेजर.

महाराष्ट्राची पहिली व एकमेव शेड्यूल्ड बँक

# दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लिमिटेड

## वाढता धंदा! वाढता नफा!! सर्व महाराष्ट्रभर ३० शाखा!!!

| | | |
|---|---|---|
| रोख वसूल झालेलें भांडवल | : रु. ७,६२,७०० | ३०-९-४४ पर्यंत |
| रोख वसूल भांडवल व रिझर्व्हस् | : रु. ८,१०,००० हून अधिक | ,, ,, |
| एकूण चालू भांडवल | : रु. १,३५,००,००० ,, ,, | ,, ,, |

बँकेनें सुरू अग्रहक्काच्या ( Cumulative Preference ) शेअर्सवर प्रारंभापासून ३१-३-४४ पर्यंत ५% प्रमाणें नफा वाटला आहे. १९४३-४४ सालासाठी ऑर्डिनरी शेअर्सवर ५% प्रमाणें व डिफर्ड शेअर्सवर ६% प्रमाणें नफा वाटला आहे.

कायदेशीर जबाबदारी नसतांनाही ऑर्डिनरी व डिफर्ड शेअर्सवर पहिल्या म्हणजे १९३८-३९ सालाबद्दल ३% प्रमाणें नफा वाटला आहे, व आणखी पुढच्या ४ वर्षांसाठीं ३% नफा वाटावा अशी बोर्डाची शिफारस आहे.

(Sanction of the Central Government has been obtained to this issue under D. I. R. 94A. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them.)

हिंदुस्थान सरकारनें बँकेचे दर्शनी किंमतीचे प्रत्येकीं रु. २५ चे ३६,१२७ ऑर्डिनरी शेअर्स एकूण दर्शनी किंमत रु. ९,०३,१७५ चे विकण्याची परवानगी दिली आहे. त्यांपैकीं चार लाख रुपयांचे शेअर्सची विक्री झाली असून शेअर्सना वाढती मागणी आहे.

राहिलेले पांच लाखांचे शेअर्स अंडरराईट करण्यासंबंधीं बँकेकडे मागण्या आल्या आहेत. तरी ज्यांना शेअर्स घेणें असेल त्यांनीं त्वरा करावी.

प्रत्येक शेअर रु. ३ जादा ( Premium ) घेऊन विकण्यांत येत आहे. प्रत्येक शेअरमागें रु. २५ पैकीं रु. १२-८-० व रु. ३ जादा असे एकूण रु. १५-८-० भरावयाचे. राहिलेल्या रु. १२-८-० ची मागणी केली जावयाची नसून ती रकम Uncalled Reserve म्हणून रहावयाची आहे.

**महाराष्ट्रांतील व्यापार व उद्योगधंदे वाढविण्याचे दृष्टीनें बँकांचें शेअर भांडवल मोठें असणें जरूर असते; म्हणून या बँकेचे शेअर्स घेऊन महाराष्ट्रीय व्यापाराच्या व उद्योगधंद्याच्या वाढीला मदत करा.**

शेअर्ससाठीं हेड ऑफिसकडे अगर खालीलपैकी कोणत्याही शाखेकडे मागणी करावी. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

## : शाखा :

| स्थानिक-मुंबई | बाहेरील | | | | लौकरच शाखा उघडावयाचीं ठिकाणें |
|---|---|---|---|---|---|
| १ दादर | ७ अमरावती | १३ धुळें | १९ मिरज | २५ नंदुरबार | १ अकोला ( वऱ्हाड ) |
| २ गिरगांव | ८ अहमदनगर | १४ इचलकरंजी | २० महाड | २६ पुणें | २ चांदा (मराठी सी. पी.) |
| ३ ग्रँट रोड | ९ बेळगांव | १५ जळगांव | २१ मालेगांव | २७ सांगली | ३ बेलापूर रोड } अहमदनगर जिल्हा |
| ४ जव्हेरी बझार | १० बडनेरा | १६ कोल्हापूर | २२ नाशिक सिटी | २८ सोलापूर | ४ कोपरगांव } |
| ५ शीव | ११ दिग्रस | १७ कारंजा | २३ नाशिक रोड | २९ सिन्नर | |
| ६ विलेपार्ले | १२ देवळाली | १८ लोणंद | २४ नागपूर | ३० संगमनेर | |

डी. डी. देशपांडे
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. गोविंद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. १२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.